UNIVERSAL
LIBRARY

OU_192331

UNIVERSAL
LIBRARY

# न दिसणारे जग.

रजनी गुहागर एम्. ए

रत्नाकर प्रकाशन संस्था सांगली.

प्रकाशक:—

रतनलाल डी. शहा, एम्. ए.
रत्नाकर प्रकाशन, सांगली.

मावृत्ती. डिसेंबर १

किंमत १ रुपया.

मुद्रक:—

रतनलाल डी. शहा, एम्. ए.
रत्नाकर छापखाना सांगली.

रत्नाकर प्रकाशन

प्रकाशनाच्या व तत्संबंधी इतर कित्येक बाबतीत मला वेळोवेळी मदत केल्याबद्दल श्री० बा. श्री. दंडगे, श्री. अनंत अंतरकर, सौ. कान्ता शहा, श्री. कोदरलाल शहा, आर्टिस्ट शं. तु. माळी, श्री. पु. बा. कुलकर्णी आदींचा मी अतिशय आभारी आहे.

—प्रकाशक.

न दिसणारं जग ! नी त्यांत वावरणाऱ्या व्यक्तिंची पत्रं. पुष्कळांना ती काल्पनिक वाटतील, तर कांहींना त्यांत निवेदन केलेले प्रसंग अशक्य कोटींतील वाटतील. पण मी खात्रीनं सांगूं इच्छितें कीं, पत्रांतील व्यक्तींची नावं जरी काल्पनिक असली तरी, बहुतेक सर्व पात्रं सत्यसृष्टींत वावर-णारीं आहेत.

त्याच व्यक्तींना मी ही पत्रं अर्पण करीत आहे.

—रजनी गुहागर.

# स्त्री हृदय : : १

प्रियाल !

काल मी सहज बोलतां बोलतां 'मला मरावसं वाटतं' असं वैतागानं तुमच्यापुढं बोलून जातांच तुम्हांला महदाश्चर्य वाटलं. 'मी चेष्टा तर करीत नाही ना?' असाही विचार क्षणभर तुमच्या मनांत येऊन गेला असावा. तुमच्या चेहऱ्यावर उमटलेली विस्मयाची छटाच तं दर्शवीत होती; पण माझ्या उदास, गंभीर चेहऱ्याकडं तुमचं लक्ष जातांच तुम्ही गोंधळलांत; आणि त्या प्रक्षुब्ध मनःस्थितीतच तुम्ही बोलून गेलांत, 'छे! छे! इतका पैसा नी एवढी कीर्ति मिळत असतां कुणाला मरावसं वाटेल ?

ज्याच्याजवळ मुबलक पैसा आहे, [illegible] ज्योत अखंड तेवत आहे, त्याला जगावंसं वाटलंच पाहिजे, असाच आपल्या बोलण्याचा रोख होता. आणि या दोनीही गोष्टी माझ्याजवळ असल्यानं मी मरायच्या गोष्टी बोलणं जवळ जवळ वेडेपणाचच आहे, असंच आपलं [illegible] होतं. म्हणूनच आपण विनोदानं त्यावर कोटी [illegible] करीत. "पैसा आणि कीर्ति ही पति-पत्नी कल्पल्यास सुख हे त्याच अपत्य कल्पावं."

तशी कल्पना केल्यास त्याला माझी कसलीही हरकत नव्हती, पण त्याबरोबरच आपण दुसऱ्या अपत्याकडं कानाडोळा करायला नको होता. पैसा आणि कीर्ति पासून जसं सुख उत्पन्न होतं, तसंच दुःखही नाहीकां होतं.?

काल्पनीक मनोरे रचण्याची सवय झालेल्या तुम्हांला नाही पटायचं हे. पण पैसा आणि कीर्ति, या दोनीही गोष्टी साध्य झालेल्या मला, तसं वाटतं. नव्हे आतापर्यंतच्या माझ्या आयुष्यातील, अनुभवावरुनच मी तसा निष्कर्ष काढला आहे.

प्रियाल ! पहिल्यापासून मला मन चाहेल त्या प्रमाणं वागण्यची सवय. नटण्यामुरडण्याचीं तर दांडगी हौस. एकादी गोष्ट कुणी करुं नकोस म्हणून सांगताच,

मी ती हटकून केलीच म्हणून समजाव. लोकाना काय करायचंय् माझ्याशी ? हीच उद्याम वृत्ती. पण माझ्या घरातील वडील मंडळीना माझं हे वर्तन मुळीच आवडते नसें. त्यानी मला वरचेवर उपदेश करुन, माझ्या बेछूट वृत्तीस आळा घालण्यास सांगावं. आणि मी नुसतं 'हु' म्हणूनं माझं वर्तन पूर्ववत चालू ठेवाव.

एकदां काय झालं, मी माझ्या मैत्रिणीकडं संध्याकाळीं बसायला म्हणून गेलें; तो ती सिनेमास निघालीं होती. मी ही तिच्याबरोबर सिनेमाला गेल. आणि साडेनवाला घरी परतले.

नेहमी प्रमाणं मी कुठं जातें हे, आई--बाबांना घरुन निघतें वेळी न सांगितल्यानं, चिंतातुर झालेलें ते दोघेही, माझी वाट पहात बसलें होतें. मला पहाताच, अतिशय संतापलेले बाबा चवताळून माझ्या अंगावर आले; आणि नाही नाही ते बोलूं लागले. माझ्याही जिभेचा पट्टा सुरु झाला; नि मी उत्तराला प्रत्युत्तर देऊं लागलें.

आता मात्र बाबांचा राग अनावर झाला. रागानं सर्वांग थरथर कापणारे ते मला म्हणाले, 'या पुढें मी तुझें असलें चाळे मुळींच चालू देणार नाहीं. तुला माझ्या सांगण्याप्रमाणं वागायचं असल्यास या घरांत रहा. नाहीतर हो चालती इथून.'

आपल्या स्वाभिमानावर घाला घातला गेला असं-कल्पून, खोटया अभिमानाला बळी पडलेली मी, तात्काळ घराबाहेर पडले. मागचा पुढचा विचार न करतां, ताईच्या विनंतीस न जुमानतां, मी तशीच घराबाहेर पडलें. मला या कंपनीत त्यापूर्वीच बोलावणं आल्यामुळंच बेधडकपणें घर सोडतां आलं. बाबानी मला पोसलं नाही तर मी स्वतःच स्वतःला पोसेन हीच घमेंड. स्वतःच्या पायावर उभं राहण्याची ताकद आल्यावर काय म्हणून मी माझ्या वडीलांचे कटु वाक्प्रहार सहन करीत रहावं? हीच बंडखोर मनोवृत्ति, त्यावेळी माझ्या मनांत भिन-ली होती.

कित्येक स्त्रिया, मास्तरीण, डॉक्टरीण, आणि नर्सच धंदा करुन, नाही कां द्रव्योपार्जन करीत? तसच आपण नटी म्हणून पैसा मिळवावा. त्याबरोबर कीर्तिही पण मिळवावी; आणि पुरुषांच्या मदती वाचून आम्ही स्त्रिया राहू शकतो; इतकंच नव्हे तर मुबलक पैसा नि जागति-क कीर्ति मिळवूं शकतो; हे जगाला स्वानुभवानं दाखवून द्यावं या इच्छेनं प्रेरित झालेली मी, सिनेमा नटी म्हणून या कंपनीत दाखल झालें.

माझे पहिले कांहीं दिवस फारच सुखाचे गेले. मी अहोरात्र माझ्या चित्रपटातील नायिकेच्या कामाविषयीं विचार करावा, ते उत्कृष्ट कसं होईल या बद्दल खूप

झटाव. दिग्दर्शकानं नि मालकानं, माझं काम उत्कृष्ट होणार असल्याचं सांगताच, मला स्वर्ग दोन बोट उरल्यासारखं वाटावं.

हे भाग्य मला फारच थोडे दिवस लाभलं. एक दोन महिन्याचा काळ लोटतो न लोटतो तोंच, रंगतालीम संपून शुटिंगला सुरवात होते न होते तोंच, तरुण दिग्दर्शकानं व वृद्ध मालकानं, माझी जी तोंड भरुन स्तुती आरंभिली होती, त्याचं मला खरं कारण कळलं. त्यांची नजर माझ्या सौंदर्यावर होती. मुसमुसणाऱ्या तारुण्यावर होती. त्यांनी मला तसं स्पष्टपणें बोलूनही दाखविलं; आणि मी त्याला जोरान विरोध करतांच, माझं चित्रपटातील पहिलंच काम अयशस्वी करुन, मला सिनेमा सृष्टीतून नामशेष करण्याची त्यांनी धमकी दिली.

ती सबंध रात्र रडून नि जागून काढली मी. आधीच करार झाल्यानं, चित्रपट पुरा केल्यावाचून मला जातां येणं शक्य नव्हतं. आणि माझ्या पुढील जीवनाची, माझ्या कीर्तीची, सारी भर त्या चित्रपटावर असल्यानं, तो अयशस्वी होऊ देणं केव्हांही योग्य नव्हतं. हितकारक तर नव्हतंच नव्हतं. मग तो यशस्वी करण्याचा उपाय म्हणजे············

त्या कल्पनेनंच माझ्या अंगावर शहारे उभे राहिलें, मालकाला, डायरेक्टरांला, मी खूप विनाविलं,

आळविलं. त्यांच्यापुढं अश्रू शिंचन देखील केलं. पण त्यानं कांहीं त्यांच कठोर हृदय द्रवलं नाही. त्यांचा निश्चय डळमळला नाही. नाखुशीनं कां होईना मला त्यांच्या पापी वासनेला बळी पडावं लागलं; आणि पुढं ते आमचं नेहमीचच होऊन बसलं.

माझं चित्रपटातील पहिलंच काम उत्कृष्ट झाल्या-चा सर्वत्र बोलबाला झाला. सर्व नियतकालिके माझ्यावर स्तुती सुमनांचा वर्षाव करूं लागली; माझा पगार वाढला; आणि मी बऱ्याच दिवसांपासून मनांत अ.खून ठेवलेलं कीर्तीचं शिखर मला गाठतां आलं.

पण मला एकदम दुःख सागरांत लोटणारी एक गोष्ट घडली. ती म्हणजे मला राहिलेला गर्भ.

ही गोष्ट मालकाच्या ध्यानांत येतांच, त्यानं मला गुपचुपपणं गर्भपात करणेंस सांगितलं.

कारण लग्नापूर्वी मी आई झाल्याचं लोकांना पहावलं नसतं; आणि सिनेमांत जाऊनही कुलीन स्त्रियांना आपलं शील पवित्र ठेवतां येतं असल्याची घोषणा पण मला करतां आली नसती, की आमच्या कंपनींत कुलीन स्त्रियांना अतिशय चांगल्या रीतीनं वागविण्यांत येतं अस-ल्याचा जगभर, डंका पिटवून, भोळ्या भाबड्या, गरिबी-मुळं, किंवा कीर्तीच्या फाजील हव्यासामुळं, सिनेमांत शिरू पहाणाऱ्या, तरुण सुंदर मुलींना माझ्याप्रमाणेंच आपल्या

कंपनींत ठेऊन घेऊन, मालकाला फसवितां आलं नसत. आणि त्याबरोबरच एक सुविद्य कुलीन नटी म्हणून माझ्या नांवाची जाहिरात करुन कंपनीस पैसा उकळतां आला नसता.

मला मनस्वी सन्ताप येत होता या गोष्टीचा. दांभिकपणाचा मला [illegible] तिटकारा; पण माझ्या अब्रूच्या रक्षणासाठी, माझ पापाचरण लोकांच्या निदर्शनास आणू न देण्यासाठी मला त्याच दांभिकपणाचा आश्रय घ्यावा लागत होता.

त्यालाही माझी तयारी होती. पण गर्भपात! छे! छे! ती कल्पनाच मला असह्य वाटत होती.

गर्भ राहिल्याच मला कळून चुकतांच माझ मन अतिशय कष्टी झालं. पण त्या गर्भाचा, माझ्या पोटच्या पोराचा, मी माझ्या हातानी नाश करण्याची कल्पनाच माझ्या मातृहृदयाला सहन होईना. मी महापतक करीत असल्याचं माझ पापभिरु मन मला सांगत होतं, पण... शेवटी माझ्यातील सैतानाचा जय झाला, आणि मी मालकाच्या इच्छेप्रमाणे वागण्याच ठरविलं.

मी गर्भपात केला. मला वाटत होतं की सर्व गुपचुपपणें पार पडल, पण लगेच मला कळुन चुकलं की ही गोष्ट केव्हांच सर्व जगभर होऊन चुकली आहे. माझ्या हितचिंतकापैकी (?) कुणीना कुणी या गोष्टीचा

स्फोट केला होता. आणि त्याचा प्रतिध्वनी निरनिराळ्या नियत [illegible] सारखा उमटत होता.

त्या आवाजानं माझे कान बधिर झाले. हृदय कातर बनलं, पण वेळीच धैर्यानं हात दिल्यामुळं मी आलेल्या सङ्कटाशीं तोंड देण्याचा निर्धार केला.

आतां मी खरीखुरी ' मिस् ' बनलें, लोक मला तसं ओळखू लागले. तरीही माझं आचरण पवित्र असल्याचा बहाणा स्वत:च्या [illegible] मला करावा लागत होता. आणि आहेही.

मला या सर्व गोष्टींचा अतिशय वीट आला आहे प्रियाल ! माझ्या अन्तरंगातील वेदना असह्य झाल्या आहेत. जगांत वावरतांना माझा चेहरा हंसरा ठेऊन मी अतिशय सुखी असल्याचा बहाणा करतें खरी, पण माझ्या मनाची सारखी तळमळ चाललेली असते. मी जगाला फसविलं तरी माझ्या मनाला फसवू शकत नाही. सर्वांना सुखी वाटणारी मी अतिशय दु:खी असल्याची माझ्या मनाची पूर्ण खात्री झाली आहे.

तरीही मी अंगिकारलेला पेशा सोडणं मला कठीण जाऊं लागलं आहे. दारूसारखं हे एक व्यसनच आहे म्हणेनांत ! वाईट असल्याचं कळतं. मनाला पटतं; पण वळत नाहीं. कृतींत उतरत नाहीं. आजूबाजूचं

वातावरण उतरूं देत नाहीं. त्यामुळं पुढं मिळणारा पैसा, आणि पूर्वी मिळविलेली कीर्ती यावर पाणी पडेल असं वाटूं लागतं.

प्रियाल ! पैसा आणि कीर्ती असूनही मनुष्याला विशेषतः स्त्रियांना, दुःखी करणाऱ्या, जीवन निरर्थक आहे, असं वाटणेस भाग पाडणाऱ्या, अशा कांहीं गोष्टी आहेत. ही गोष्ट आतां तरी पटली कां तुम्हांला ? माझ्या मतें प्रीति आणि अपत्य यांचा स्त्री–जीवनाशीं जितका जवळचा संबंध आहे; जिव्हाळ्याचा संबंधआहे, तितका कीर्ती आणि पैसा यांचा नाही.

माझ्यावर खरखुर प्रेम करणारी जर कां एखादी व्यक्ति भेटेल, माझ्या अर्भकाला बरोबर घेऊन त्याची आइ म्हणून समाजांत—प्रतिष्ठित समाजांत—जर कां मला वावरतां येईल, तर मी या दोनीवरही आनंदान पाणी सोडणेस तयार आहे.

प्रियाल ! मी आजपर्यंत कितीतरी चित्रपटांतून नायिकेचं काम केलेलं असेन. प्रत्येक खेपेस नायकाच्या रुपानं माझ्यावर प्रेम करणारं कुणीना कुणी असतंच, पण तस प्रेम करणारं माझ्या खऱ्या खुऱ्या आयुष्यांत मला कुणी भेटेल कां ?

प्रियाल, माझ्याभोंवतीं भ्रमराप्रमाणं घिरट्या-घालणारा कितितरी तरुणांचा घोळका आहे. त्यांत

कॉलेज विद्यार्थ्यांपासून, गॉडस नटापर्यंत सारे आहेत. पण त्यांच्यापैकीं एकाचं तरी माझ्यावर खरखुरं प्रेम असेल तर शपथ. कुणाला मी प्रसिद्ध सिनेमा नटी आहे म्हणून, तर कुणाला मी रुपेरी पडद्यावर अतिशय सुंदर दिसते म्हणून, प्रेम करावसं वाटतं. तर कांहींना मी मोठा पगार मिळवणारी सिनेमानटी असल्यानं, नटीचा नवरा होण्याचं भाग्य मिळतं, व त्याबरोबरच आयती जिवाची मुंबई करतां येते म्हणून माझ्यावर प्रेम करावसं वाटतं. क्षणिक सुखाच्या लालसेनं माझ्याकडं पाहणारे हरीचे लाल तर पुष्कळ आहेत.

प्रियाल ! मला नको आहे असलं प्रेम.

मला माझ्याकारतां प्रेम करणारी व्यक्ति पाहिजे. माधवानं मालतीवर, रोमियोनं ज्युलिएटवर केलेलं प्रेम पाहिजे.

परवाचीच गोष्ट. मी काम केलेला चित्रपट नुक-ताच इथं लागला होता. माझ्या कांही मित्रमंडळींचा आग्रह पडल्यानं मीही संध्याकाळच्या शोस हजर राहिलें होतें. इंटरव्हलच्या वेळीं मी सहज चौफेर नजर फिरविली; तों मला माझी बहीण आपले पति व मुलांसह फॅमिली-सर्कलमध्यें बसल्याच दिसलं.

ती हांसत हांसत त्याला कांहींतरी विचारीत होती आणि तोही पण हांसतच तिला उत्तर देत होता. त्या

ोघामध्यें बसलेल्या ुलानं मध्येंच कांहींतरी विनोद केला. आणि त्या दोघानींही हर्षभरान पटापट याचे मुके घेतले.

प्रियाल! मला असलं जीवन कठतां आलं पाहिजे.

मला मोठा हेवा वाटला माझ्या बहिणीचा. ती गरीब आहे· पण...........

सिनेमा संपतांच मी घाईघाईनंच बाहेर आले. थोड्यावेळानं माझी बहीण आपल्या पति व मुलासमवेत मी उभ्या असलेल्या बाजूनच आली. तिनं मला पाहिलं. ओळखलं. पण मुद्दामच न पाहिल्यासारखं करून ती जिना उतरूं लागली.

माझ्या काळजाचं पाणी पाणी झालं. माझी बहीण मला मुद्दाम चुकवित होती. टाळाटाळ करीत होती. फारकाय ती माझी बहीण असल्याच दुसऱ्याला कळूं न देण्याची तिची इच्छा दिसत होती.

याच कारण स्पष्टपणें कां सांगायला हवं?

प्रियाल! मला माझ्या लोकांपासून दूर करणारी, मला खऱ्या प्रेमाला पारखी करणारी, ही कीर्ती व हा पैसा मला नको आहे.

माझ्या बालपणाच्या जगांत, माझ्या आप्तइष्टांत

मला उजेळ माथ्यान हिंडतां फिरतां आलं, मी एका गोंडस मुलास जन्म देऊन तें माझं असल्याचं मोठ्या अभिमानान सांगून त्याला खेळवता आलं, आमच्याकडं कौतुकानं स्निग्ध नजरेनं, माझे प्रेमळ पति पाहात असणारं भाग्य जर कां मला लाभलं, तर मी पैशावर आणि कीर्तीवर पाणी सोडण्यास एका पायावर तयार आहे.

पण तसं भाग्य मला केव्हां तरी लाभेल कां?

— मृणाक्षी

लिखाण तारीख ३-१०-१९३९

# पापी-पुजारी : : २

**बाई!**

काल आपली शाळा तपासण्यासाठीं आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यापुढं तुम्ही माझ्या वडिलांची तोंड भरून स्तुति करीत होता. आपण एखाद्याची भरमसाट स्तुति करतों आहोंत ही गोष्ट समोरच्या व्यक्तीच्या ध्यानी मुळीच न येईल अशा रीतीनं सर्व गोष्टी निवेदन कर-ण्याची हातोटी तुम्हांला चांगली साधली आहे. माझ्या दादाच्या अतुल स्वार्थत्यागाचें अढळ देशभक्तिचें, तुम्ही गोडवे गात असतां, भोळा भाबडा तो अधिकारी विस्मय-चकित तर झाला होताच पण माझे दादा म्हणजे त्याला

एक आदर्श व्यक्ति वाटत होते. एक अनुकरणीय पुढारी वाटत होते.

ते ऐकत असतां माझ्या डोक्यांत विचारांची खळबळ उडाली. कुणीतरी माझ्या कानांत जहाल हलाहल ओतीत आहे असं मला वाटलं. माझं मन गोंधळलं. चलबिचल झालं. शेवटी तर माझ्या मनांतील विचार इतक्या जोरानं उचंबळून आले कीं, भान न राहून चटदिशी तुम्हांला बोलून गेले. ‘ बाई ! शोभत कां तुम्हांला हे ? ’

माझ्या प्रश्नांतील कनव चटकन तुमच्या ध्यानी आल्यानं तुम्ही मला दाबलंत. एवढाले डोळे करून माझ्याकडं पाहिलंत नी चेहरा असा कांही वेडा वाकडा केलांत की......

मी गप्प झाले. घाबरून नव्हे, तसं बोलण्यांत माझी चूक झाल्याचं मला कळून चुकलं म्हणून नव्हे, तर इतक्या लोकांदेखत, त्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या देखत, तुम्हाला अधिक उणा शब्द वापरून मर्यादेचं उल्लंघन करणं बरं न वाटल्यामुळं.

पण मनांतल्या मनांत माझे विचार तुमच्यापुढं स्पष्टपणें बोलून दाखविणेस मी फारच उत्सुक झालें होतें. आणि तेवढ्याचसाठीं मी तो अधिकारी निघून जाण्याची

मोठ्या आतुरतेनं वाट पाहूं लागले.

तुह्मीही तो अधिकारी निघून जाण्याचीच वाट पहात असल्याचं मला दिसलं. आरंभिलेलं दादा-पुराण तुह्मी एकदाचं आटोपतं घेतलत, आणि केलीत रवानगी त्या अधिकाऱ्याची.

तो जातो न् जातो तुह्मी मला ह्मणालांत ' केव्हां नी काय बोलावं हें कळतं कां तुला अभया ? '

हा प्रश्न कांहीं अनपेक्षित नव्हता मला. असं कांहींतरी तुह्मी मला विचारणार हें मी भाकीत केलचं होतं ह्मणा. आणि त्याला जें उत्तर द्यायच तें मी मनांत आंखूनही पण ठेविलं होत. तें तुमच्यापुढं बोलून टाकणार तोंच दुसरी कांही मंडळी तिथं आली नी त्यांत तुह्माला गुंतून पडावं लागल, अन् मला माझे विचार आतल्या आंत दाबून ठेवावे लागले.

पण ते केव्हांना केव्हां तुमच्यापुढं मांडल्याशिवाय, खुल्या दिलानं सर्व गोष्टी तुह्माला निवेदन केल्याशिवाय, माझ्या मनाचं समाधान होणं शक्य नव्हतं; त्यामुळं तुह्मी आजपर्यंत मला दिलेल्या सत्याच्या शिकवणीला काजळ फासल्यासारखं झालं असतं. ह्मणूनच मी ते खुल्या दिलानं तुमच्यापुढं मांडणार आहे.

बाई ! माझ्या दादांचं चारित्र्य तुमच्या पूर्ण

परिचयाचं आहे. दारु आणि दारा यांच्यावाचून त्यांचा एकही दिवस सुना जात नसल्याचं तुह्मी जाणतां; अन् ह्मणूनच तुह्मी माझ्यापुढं ' दादा, दारू नी दारा ' यांचा कसा पण मेळ जमतो असं विनोदानं बोलल्याचं तुह्मांला स्मरत असेलच.

दादांचं आचरण अशातऱ्हेच असतांहि, समाजांत त्यांच वागणं किती सांबाचं त्यांनीं दारूबंदीवर व्याख्यानं झोडलीं नाहींत, मोठमोठाले लेख लिहून त्याची माहती लोकांना पटविण्याचा प्रयत्न केला नाहीं, असं आलीकडे कधीतरी झालं आहे कां ?

लोकांना पापाचरणापासून परावृत्त होण्यासाठीं, शुद्ध खादी परिधान करून, अन्नपाण्यावाचून खितपत पडेलेल्या आपल्या हाजारों देशबांधवानां मदत करण्यासाठीं मोठ्या मानभावीपणानं त्यांनीं विनविलं नाहीं, वेळ प्रसंगीं डोळ्यांतून टिप पण गाळली नाहींत, , असं केव्हांही झालं नाहीं. ढोंग, निव्वळ ढोंग आहे हें !

गेल्या असहकारतेच्या चळवळीच्या वेळची गोष्ट. दादा नुकतेच रावबहादुर झाले होते. आणि त्यांना त्याचा मोठा अभिमानही पण वाटत होता त्यांनी आपल्या हाताखालच्या लोकांकडून कित्येक सभा भरविल्या. आपलं गोडवं गाऊन घेतलं पुष्कळ मानपत्रही घेतलीं. फोटो काढविले. आणि केवळ लोकाग्रहास्तव ती

फ्रेम करून दिवाणखान्यांत टांगली, अन् एक पाऊल पुढं या न्यायानं त्यांनीं दिवाण बहादुर होण्यासाठीं प्रयत्न सुरुं केले. त्या करिता मोठमोठाल्या अधिकाऱ्यांना भेटणं, कांहींना कांहीं निमित्तान त्यांना आपल्याकडं बोलावून घेऊन पार्टी देणं, त्यांच्या समवेत आपला फोटो काढविणं, इतरांच्या कडून आपल्या राष्ट्रकार्याचा, त्यांनीं माय–बाप ब्रिटिश सरकारला वेळोवेळीं केलेल्या मदतीचा, पाढा वाचविणं इत्यादी गोष्टी सारख्या चालू होत्या.

तोंच कॉंग्रेसनं महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं असहकारतेची चळवळ सुरूं केली. मोठ मोठाल्या पुढाऱ्यांनीं त्या संग्रामांत भाग घेतला, कारागृहवास पत्करला, नी नाहीं नाहीं ते हाल सोसले.

दादा नहमीं या लढयाबद्दल आणि त्यांत भाग घेतलेल्या पुढाऱ्याबद्दल अनुदार उद्गार काढीत, इतकंच नव्हे तर महात्मा गांधी आणि त्यांचे अनुयायी यांचा सदानकदा उपहास करणं, त्यांच्या सत्य आणि अहिंसेच्या तत्वाची टर उडाविण, हा त्यांच्या विनोदाचा एक प्रकार असे, अन् त्यावर त्यांच मोजक्या मडळींत बोलणं चाललं असतां हास्यकल्लोळ उडाला नाहीं अस कधी झालं नाही.

पण पुढं चळवळ थांबली. तुरुगातील पुढारी बाहेर पडले. सर्व हिंदुस्थानभर फिरून शांतता प्रस्था-

पित झाली.

कॉंग्रेसचं बळ वाढलं. पुढाऱ्यांचं महत्व लोकांना कळलं. कॉंग्रेसचा संदेश देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोचला. तुरुंगाची वारी करून आलेल्या पुढाऱ्यांच्या तसबिरी जिकडं तिकडं दिसू लागल्या. अन् खेड्या-पाड्यातील लोक देखील उत्साहानं राजकारणांत लक्ष घालू लागले.

लोकांना आपल्या कर्तव्याची जाणीव झाल्याचं, कॉंग्रेसच्या कार्याविषयी अतिशय सहानुभूति वाटत असल्याचं, वरिष्ठ पुढाऱ्यांना कळून चुकतांच त्यांनी कौन्सिलची निवडणूक लढविण्याचं ठरविलं.

दादा फारच दूरदर्शी तसच मुत्सद्दी असल्याचं तुम्ही जाणतांच. कॉंग्रेसकडं बहुजन समाजाचा ओढा असल्याचं त्यांनी तात्काळ जाणलं. अन् ही कौन्सिलची निवडणूक कॉंग्रेस जिंकणार, व सर्व अधिकाऱ्याच्या जागा पटकविणार असल्याच पण त्यांनी भाकीत केलं.

त्यांची महत्वाकांक्षा जागृत झाली. दिवाणबहादुर होण्यापेक्षां एखाद्या दिवाणांची जागा पटकावली तर काय बहार होईल, या कल्पनेनं त्यांचे डोळे आनंदानं चमकले. आणि डोकं खा-खाजवून त्यांनी एक बेत आंखला, व तो ताबडतोब अमलांत आणलाही.

एका प्रचण्ड जनसमुदायांपुढं एक जोरदार भाषण

करून, आपणांस कॉन्ग्रेसचीं तत्वं पूर्णपणें पटल्याचें, व महात्मा गांधी याच्या नेतृत्वाखालीं कॉन्ग्रेसनं आखलेल्या मार्गानंच आपला स्वातंत्र्याचा कन्टकमय मार्ग सुगम होणार असल्याचं सांगून, आपण कॉन्ग्रेसचे सभासद झाल्याचं त्यांनी जाहीर केलं.

अन् त्याबरोबरच आपली 'रावबहादुरी' परत करून आपणांस खरोखरच उपरति झाल्याचं लोकांच्या निदर्शनांस आणून दिलं, आणि भररांभेत आपल्या अन्गा-वरील परदेशी कपड्यांची होळी करून खादीवस्त्र परिधान करून लोकांना आपल्या देशभक्तीची खात्री पटवून दिली.

पुढं बेकायदेशीर ठरविलेल्या सभेचं त्यांनी अध्य-क्षस्थान स्वीकारल्यामुळ त्याना सजा झाली. दोन महि-न्याची शिक्षा झाली. अर्थात् त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना पहिला वर्ग मिळाला.

आपणांस शिक्षा होणार असल्याचं त्यांनी भाकीत केलेलं होतच. त्यांनी आनदानं कारागृहवास पत्करला. आणि राष्ट्राकरितां आपण आपल्या प्राणावरही पाणी सोडणेस तयार असल्याबद्दल प्रचण्ड जनसमुदायापुढं घोषणा केली. लोकांना त्यांच्या देशभक्तीची पुरेपूर खात्री पटली. अन् त्यांनीं हर्षभरांन त्यांच्या नांवाचा जयघोष केला.

तुरुंगांतून सुटून येतांच कौंसिलच्या निवडणुकीचीं

धामधूम सुरु झाली. अर्थात् दादा कॉन्ग्रेसचें उमेदवार म्हणून उभे राहिले, अन् निवडून आलेही.

पण अपेक्षेप्रमाणें ते दिवाण न होतांच त्यांचं पित्त खवळलं. त्यांच्या नसनसांतून रागाच्या लहरी उसळूं लागल्या. त्यांच्यातील सैतान जागा झाला. अन् त्यांनी त्यांना दिवाणपद मिळूं देण्याविषयी प्रयत्न न केलेल्या त्यांच्या सहकार्यांवर सूड उगविण्याचं ठरविलं. आणि गेले कित्येक दिवस प्रतिपादित असलेल्या अहिंसा व सत्याला बगल देऊन त्यांनी कित्येक खऱ्या खुऱ्या पुढाऱ्यांचे बळी घेतले. कॉन्ग्रेसच्या कांही डिक्टेटराशी मसलत करूनच त्यांना आपला उद्देश साधतां आला. अन् एकदाचे ते म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष व जिल्हा स्कूलबोर्डचे चेअरमन् बनले. कारण दिवाणपद आतां शक्य नव्हतें.

पुनः त्यांचीं अहिंसा व सत्यावर जोरजोरानं व्याख्यानं सुरू झाली. निस्वार्थीपणाच्या व समाजोन्नतीच्या वल्गना हो, वल्गनाच त्या, आणि याचं ताजं उदाहरण म्हणून आपल्याच शाळेच्या शिक्षकीण भोसेकरबाई यांच्याकडं बोट करतां येईल. परित्यक्ता आहेत त्या. शिवाय तरुण नी सुंदर आहेत. अशाच स्त्रियांच्या उन्नतीसाठीं आमच्या दादांची सारखी धडपड चाललेली असायची. त्यानी तिला आपल्या जाळ्यांत

अडकाविण्याचं ठरविलं. पण ती कांहीं केल्या त्यांना बधेना, तेव्हां त्यांनी तिला धाक देऊन पाहिला. स्कूल-बोर्डाचे चेअरमन् होते नां ते! तिला ताबडतोब नोकरी वरून काढून टाकण्याची धमकी दिली. आणि पुढं... तुह्मी सर्व कांहीं जाणतांच.

खरी वस्तुस्थिति अशी असतां, दादांचं अतरंग माझ्याप्रमाणंच तुह्मी पुरं जाणत असतां, तुह्मी त्यांची तोंडभरून स्तुति करावी, आह्मा विद्यार्थिनींच्या समक्ष स्तुति करावी, हें अयोग्य नाहीं कां? बाई! खरी स्तुति केव्हांही चांगली, पण खोटी तितकीच वाईट नाहीं कां?

विद्यार्थ्यांनां चांगलं वळण लावण्याची, खरें खरें नागरीक तयार करण्याची जबाबदारी तुह्मा शिक्षकावर असते. तुह्मी बनवाल तशी त्यांची मनोभूमिका तयार होत असते. तेंच जॉर्ज वॉशिंग्टन, नामदार गोखले यांचा आदर्श पुढं ठेऊन सत्यानं वागणेंस पुनः पुनः बजावून सांगणाऱ्या तुह्मी, भर वर्गात सर्व विद्यार्थिनींच्यासमोर धडधडीत असत्य गोष्टी सत्य ह्मणून आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला निवेदन करणं चांगलं कां? यामुळं आमची प्रवृत्ति असत्याकडं वळणार नाहीं कां? मग तुमच्या शिक्षणाचा फायदा तो काय झाला? फार काय तुह्मी आह्मांला चांगला मार्ग दाखविण्याऐवजीं वाईट

मागालाच आणून सोडतां आहांत असं मी ह्मटल तर तें खास अयोग्य होणार नाही.

आणि बाई ! अशा आपला समाज बिघडण र नाही कां ? आपली तरुण पिढी ढोंगी, असत्यवादी, स्वार्थी निपजणार नाही कां ? मग तुम्हीच सांगा असे लोक राष्ट्राचा उद्धार तो काय करणार ?

महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, बाबू सुभाषचंद्र बोस, यांच्या सारख्या महनीय पुढाऱ्याबद्दल नेहमी माझं मस्तक आदरानं नमत राहील; त्यांच्या अतुल स्वार्थत्यागाचें गोडवें मी नेहमीं गात राहीन. पण त्याबरोबरच त्यांच्या मांडीशी मांडी लावून बसणाऱ्या, इतकंच नव्हे तर सर्व सत्ता हातीं बळकावून बसलेल्या व मदांध, दुर्व्यसनी, अशा कांही प्रतिष्ठित गुंडाना पाहिलं म्हणजे शरमेनं मान खाली घालावं असं मला वाटू लागतं; आणि आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळून अशा नीच, अधम, मनोवृत्तीच्या लोकांच्या हातांत सत्ता जाण्यापेक्षां तें स्वातंत्र्य न मिळालेलंच बरं, असं वैतागाच्या भरांत वाटू लागतं.

बाई, आमचे दादाही अशाच लोकांच्या पंक्तीला बसत नाहीत कां ?

अशा बापाच्या पोटीं जन्म घेतल्याबद्दल लोक मला धन्य समजत असतील, माझ्या भाग्याचा हेवा करत

असतील. पण मला, खरं सांगायचं म्हणजे, या बापाच्या पोटी जन्म घेतल्यामुळं लाज वाटते. माझं अन्तःकरण तिळतिळ तुटतं. पुष्कळदां माझा मलाच राग येतो. अन् वैतागान हें घर सोडून कुठं तरी दूर अज्ञात ठिकाणी जाऊन रहावंस वाटतं.

देवीला प्रसन्न करायचं झाल्यास, तिला आळवणाऱ्या, तिची पूजा करणाऱ्या भक्ताचं आचरण पवित्र असावं लागतं. त्याच्या मनांत सद्भाव वसावा लागतो. हा पुजारी एखादे वेळेस विद्वान् नसला तरी परवडला पण त्याचं आचरण अपवित्र असल्यास, लोकांना आपण देवीचे भक्त असल्याचं भासविण्यासाठी, पण खरे स्वःताचे उदर—भरण्यासाठी, स्वःताचीं प्रतिष्ठा वाढविण्यासाठी, जर कां तो देवीचे गोडवे गात असेल तर, त्याच्यावर देवी कधी काळी प्रसन्न होणं शक्य आहे कां ?

हाच नियम स्वातंत्र्य देवतेलाही पण नाहीं कां लागूं पडत ? तिची पूजा करणारे माझ्या दादासारखे पापी पुजारी पाहिले म्हणजे तिची त्यांच्यावर अवकृपा झाली नाहीं तरच नवल.

आणि एवढ्याच साठीं काल तुम्ही दादांची खोटी स्तुती आरंभिली असतां मी नाखुषी दर्शविली.

—अभया

लिखाण तारीख. १०-१०-४०

# पति-पत्नी : : ३

लता !

कुणीही हेवा करावा इतकं तुझं भाग्य आहे मोठं! तूं इतकीशी सुंदर नसतांही तुला अतिशय श्रीमंत स्थळ मिळालं. तुमच्या मारवाडी समाजांत उच्च शिक्षण घेतलेलं लोक फारच थोडें. श्रीमंतांत तर हाताच्या बोटावर मोजण्या इतकें देखील सांपडायचें नाहींत. असं असतांही तुला बॅरिस्टर झालेला पति मिळाला.

तरीही तुला तुझा संसार निरानंदमय वाटावा याचं मला राहून राहून आश्चर्य वाटतं. तुझं तुझ्या पतीशीं पटूं नये, तुझ्यांत नि त्यांच्यांत मोकळेपणा असूं नये, याबद्दल मोठं कोडं पडतं माझ्या मनास.

माझ्या जागी दुसरी एखादी असती तर, तिला वाटलं असतं कीं तुमचं एकमेकांवर प्रेमच नसलं पाहिजे,

पण मला, तुम्हां दोघानाही पुऱ्या ओळखणाऱ्या मला नाही तसं वाटत. तुझं ज्याप्रमाणं तुझ्या पतिवर निरतिशय प्रेम आहे तसंच तुझ्या पतीचंही पण तुजवर आहे. तू म्हणशील त्यांच्या बाह्यांग वर्तनावर मी फसतें आहे. मी ज्याला प्रेम म्हणतें तें खरं प्रेम नसून प्रेमाचं ढोंग आहे.

लता! पुरुषांचं हृदय जाणण्याची दृष्टी आम्हा स्त्रियांना जन्मतःच असतें. दैवीच देणगी आहे म्हणेनास ही. त्या माझ्या दृष्टीला स्पष्टपणें दिसतं आहे की, तुझ्या पतीचं तुझ्यावर निरतिशय प्रेम आहे.

तू म्हणशील मी असं लिहितेवेळीं तूंही एक स्त्री आहेस हे विसरतें आहेस, नाहीं बरं! लता, तूं स्त्री आहेस, पण डोळ्यावर संशयाचं झापड आल्यामुळं तू त्या दिव्य दृष्टीला मुकली आहेस. कितीही डोळें फाडफाडून तूं तुझ्या पतीकडं पाहिलंस तरी तुला त्यांचं हृदय दुसऱ्या स्त्रीच्या मूर्तीनं व्यापल्याचं आढळणार, आणि ही गोष्ट तुझ्या अंतरंगाचा ठाव घेत गेल्यामुळं तूं नेहमी कष्टी राहणार. अविश्वास वृत्ति धारण करून संशयी नजरेनं तुझ्या पतीकडं पहाणार.

लता! मी काल सहज बसायला म्हणून तुजकडं आलें तों तू कुठं बाहेर गेल्याचं कळलं. तू लौकर परतशील

म्हणून तुझी वाट पाहात तुझ्या खोलींत बसून राहिलें, तोंच तुझे पति कोर्टातून आले.

आमचं इकडच्या तिकडच्या विषयांवर बरचसं बोलणं झालं. बोलतां बोलतां आम्ही प्रीतिविवाहावर येऊन ठेपलों, नव्हे मी मुद्दामच तुझ्या पतीला कोणत्याही प्रकारचा संशय न येईल अशी खबरदारी घेऊन तो विषय काढला. मला त्यांचे विचार जाणण्याची फारच उत्कंठ लागली होती.

ते म्हणाले "लग्नापूर्वी जर कां कोणती गोष्ट वधुवरांच्या पालकानी पहावयाची असेल तर ती वधुवरांच्या आवडी निवडी सारख्या असण्याची, त्यांच्या मनाची ठेवण एक प्रकारेच घडविली गेल्याची. पतिपत्नीच्या आवडी निवडी सारख्या असल्यास, त्यानी एकमेकांच्या भावना जाणल्यास, त्यांच्यांत प्रेम उत्पन्न होणेंस मुळीच वेळ लागणार नाही"

माझं समाधान झालं त्यांचें ते विचार ऐकून त्यावेळीं माझ्या मनांत तुझ्या विषयींचें विचार घोळत असल्यानं मी "विचारलं त्यांना तुमचा विवाह या सदराखाली येतो कीं नाहीं ?"

माझा तो प्रश्न अनपेक्षित वाटला तुझ्या पतीना. त्यानीं चमकून माझ्याकड पाहिलं. त्यांचा चेहरा एकाएकी विषण्ण दिसूं लागला. अन् ते कांही न बोलतां स्तब्ध राहिले.

त्यामुळें मी फारच गोंधळलें. आणि अधिरतेनं त्यांना विचारलें, " कां ? माझ्या प्रश्नाचं उत्तर न देतां एकदम स्तब्ध झालांत ? "

" मला पूर्णपणें कळला आहे तुमच्या प्रश्नांचा रोख " अतिशय गंभीर चेहरा करून तें उत्तरले, "तुमच्या प्रश्नाचं उत्तर काय नी कसं द्यावं या विवंचनेंत होतो मी. " एवढं बोलून ते बसल्या जागेवरून चटकन् उठलें आणि कोपऱ्यांतील टेबलाचा खण उघडून त्यानीं आपली रोजनिशी बाहेर काढली, नी ती उघडून माझ्या पुढं करत ते म्हणालें "घेऊन जा ही घरी आणि लक्षपूर्वक वाचा ही दोन पानें"...

" म्हणजे ? ... "

" म्हणजे तुम्हांला तुमच्या प्रश्नांचं उत्तर मिळेल "

आश्चर्य वाटलं मला त्याचं. पण मी कांहीही न बोलतां उठलें, घरी आलें. किति अधिर झाले होतें मी ती रोजनिशींतील पानें वाचायला. या धांदलीत तुझ्या घरी भेटायला म्हणून येऊन तुला न भेटतांच आलें. हांसशील तूं माझ्या या धांदरट स्वभावाला.

मी घरीं येतांच जर कां कोणती गोष्ट केली असेन तर तुझ्या पतीच्या डायरींतील पान वाचण्याची.

तुझ्या लग्नानंतर साडे चार महिन्यांनीं त्यांनीं लिहिलं होतं.

इंटरव्हलच्या वेळीं लतेनं बाहेर येण्याची आपली नाखुशी दर्शवितांच मी एकटाच बाहेर आलो, अन् तिथं टाकलेल्या वेताच्या खुर्चीवर बसून व्हिम्टो घेऊं लागलो.

तोंच डावीकडच्या कोपऱ्यांत एकमेका शेजारीं खुर्च्या टाकून बसलेल्या एका तरुण जोडप्याकडं माझं लक्ष गेलं. 'पाईन-ॲपल' घेतां घेतां त्यांचं संभाषण चालू होतं.

" किती उकडत होतं आंत ! " तो तरुण उद्गारला.

" आणखी थोडें गरम कपडे घाला कीं, " मिष्किल हास्य करून डोळ्याच्या कोपऱ्यांतून त्याच्याकडं पाहात ती तरुणी म्हणाली.

त्या तरुणानं तिच्या बोलण्यांतील खोच जाणली. म्हणून विषयांतर करण्याच्या हेतूनं तो म्हणाला, "इतका उकाडा होत असतां, किती लोक आले आहेत पहा सिनेमाला "

त्यानं मुद्दाम विषयांतर केल्याचं तिनं जाणलं. ती हंसली व म्हणाली, "खोटे यांचं काम कसं काय वाटलं तुम्हांला ? "

" आतांच कसं काय सांगतां येईल बुवा ?
चित्रपट तर पुरा पाहूं दे कीं ! "

" चित्रपट पुरा पाहिलाच पाहिजे असं कांहीं नाहीं. एवढ्यावरूनच त्यांच्या कामाविषयींची बरी वाईट अटकळ खास बांधतां येण्यासारखी आहे."

" असं ! तर मग तूंच सांग, तुला त्यांचं काम कसं काय वाटलं ते "

" मला फार आवडलं त्यांचं काम " आपली खुर्ची थोडीशीं त्याच्या खुर्चीकडं सरकावित ती म्हणाली.

" कोणता प्रसंग अधिक आवडला तुला ? "

" जा गडे ! सारं मीच नाहीं सांगणार ! " मानेला एक नाजुकसा हिसडा देऊन तिनं म्हटलं " आधीं तुह्मी सांगा तुम्हांला कोणता प्रसंग अधिक आवडला तो ! "

" बरं बुवा मी सांगतो " त्या तरुणानं हांसत म्हटलं, " बुट पॉलीश करणाऱ्या मुबारकांनीं जेव्हां कां दुर्गाबाईचा हात धरला, तेव्हां त्यांनीं केलेल्या लटक्या रागाचा अभिनय ........"

"मला नाहीं आवडला तो प्रसंग इतकासा" त्या तरुणीनं मध्येंच आपली नाखुशी दर्शविली.

" मग कोणता ? "

" मुबारक सह कोचावर बसून लाजत लाजत ' पाहुनि शशि वदना ' हें पद गात असतें वेळचा."

" तुला तो प्रसंग आवडायचाच " त्या तरुणानं आलेलं हसूं आंतल्या आंत दाबीत म्हटलं. " कारण तिथं प्रणय चेष्टा आहे कीं नाहीं ?"

" इश्श !" त्याचं म्हणणं पटलं असतांही न आवडल्याचा बहाणा करीत ती म्हणाली. " तेवढ्याच करितां कांहीं तो प्रसंग मला नाहीं आवडला "

" मग कशाकरितां ? "

" ते पद म्हणत असतां दुर्गाबाईचा अभिनय इतका नैसर्गिक होतो कीं, दिल् खुश झाल्याशिवाय रहात नाहीं. "

" अरे वा ! " तो खूप मोठ्यांदा हांसत म्हणाला " बराच अभ्यास केला आहेस कीं ! "

" जा गडे ! माझं बोलणं असं चेष्टेवारी नका नेऊं " त्याच्या खुर्चीच्या दांड्यावर हात ठेवून तिनं म्हटलं, " तुम्हांला नाहीं माझ्याप्रमाणं वाटतं ? "

" कँव्हांही "

किती मोठ्यांदा हांसली ती ! तोही पण हंसला.

त्यांचं ते मोकळ, आनंदपूर्ण संभाषण कांहीं वेळ ऐकल्यानंतर, माझ्या हृदयाच्या खोल दरीमध्यें सांठवून ठेवलेल्या सुप्तशा भावना जागृत झाल्या. मी तिथून उठून आंत आलो.तो लता खालीं कांहींसं पाहण्यांत गढून गेली होती. तिनं आपला पदर पण थोडा मागं सारला होता.

पण मी आल्याचं पाहतांच, तिनं लगेच आपला पदर पुढं ओढला;अन् ती अंग चोरून बसली.

माझ्या येण्यानं तिच्यातला मोकळेपणा नाहींसा झाल्याचं मला कळून चुकलं.

" लता, येतेस कां बाहेर ? इथल्या सारखं तिथं उकडत नाहीं " मी तिला विचारलं.

" अंह " आपली नाखुशी दर्शवीत ती म्हणाली " बाहेर कुणीतरी ओळखीचं भेटायचं नि उगीच चेष्टा करीत बसायचं. "

तिच्या त्या उत्तरानं माझा सारा उत्साह, आनंद तिथल्या तिथं विरला. तरीही माझ्या वेड्या मनाला आशा वाटत असल्यानं मी तिला विचारलं. " लोक चेष्टा ती काय करणार ? अन् त्यानीं केली म्हणून आमचं काय बिघडणार आहे? मग काय येतस ना बाहेर ? "

कांहींही न बोलतां मानेला एक हिसडा देऊन तिनं ती दुसरीकडं वळविली. मी विचारलेल्या प्रश्नाला नकार होता तो.

मी कष्टी होऊन जड अन्तःकरणानं जागेवर जाऊन बसलों.

खरचं, कां बरं ही माझ्याशीं अशा रीतीनं वागतें ? आपल्या मैत्रिणीशीं, माहेरच्या मंडळींशीं तासानोतास, अतिशय मोकळेपणानं वागणारी, बोलणारी, हंसणारी, लता माझ्याशीं कां अशी वागतें ? तिच्या माझ्या बरोबरच्या वागण्यांत

कधींच मोकळेपणा नसतो. बोलण्यांत जिवंतपणा नसतो. व्यक्ति वैशिष्ट्य तर नसतंच नसतं. पण त्यांत भीति असतें. जगाची फाजील पर्वा असतें. ती बोलत असतां चहूंकडं जडतेचं वातावरण पसरतं............

माझं मन निरुत्साही बनलं. मला राहून राहून वाटे, " सारा जन्म मला जिच्या सहवासांत घालवायचा आहे, तिला माझं मन कळत नाहीं. अन् तिचं मला कळत नाहीं कसं कळावं ? जिथं मनाचा मोकळेपणा नाही तिथं............"

विचारानीं थैमान घातलं होतं माझ्या डोक्यांत.

सिनेमा संपतांच, आम्ही मोटरींत जाऊन बसलो. तों ते मगाचं जोडप टांग्यांत जाऊन बसलं. आणि त्यांचं संभाषण सुरुं झाल. बोलतां बोलतां हंसतांना तर त्यांची मुरकुंडीच वळली होती.

आणि आम्ही ? लता गुन्हेगारांप्रमाणं एका टोकांला बसली होती. अन् डोकीवरुन पदर जितका पुढं ओढतां येणं शक्य असेल तितका

ओढण्याची तिनं खबरदारी घेतली होती.

मोटार सुरू होतांच मी तिला विचारलं, "कसा काय वाटला चित्रपट तुला ?"

"बरा आहे" तिनं खालीं मान घालून उत्तर दिलं. तिच्या शब्दांत जीव नव्हता, जिव्हाळा नव्हता कीं मोकळेपणा नव्हता. मारुन मुटकून बनविलेल्या माफीच्या साक्षीदाराप्रमाणं ही उत्तर देत असल्याचा मला भास झाला.

तिकडं विशेष लक्ष न देतां मी तिला विचारलं, "बरं कोणता प्रसंग अधिक आवडला तुला ?" प्रश्न विचारीत असतां माझ्यापुढं मगाच्या त्या तरुणीचं चित्र उभं होतं.

कांहीं न बोलतां तिनं माझ्याकडं पाहून स्मित हास्य केलं, "वेड्यासारखं कांहीं तरीच विचारतां" असंच जणूं काय तिला त्यायोगं दर्शवायचं होतं.

फिरुन मी तिला प्रश्न केला "पाहुनि शशिवदना" हे पद गातेवेळचा दुर्गाबाईचा अभिनय कसा काय वाटला तुला ?"

"काय वाटायचं त्यांत ?"

तिच्या त्या उत्तरानं माझ्या साऱ्या भावनांचा चुराडा केला. जिथं तिथं परकेपणा. मोकळेपणा असा नाहीं.. माझ्याशीं बोलतांना नेहमी जिवाची कुचंबणा करून घेण्याची सवय. मनांतील विचार, मग ते कितीही उत्कट असोत ते आंतल्या आंत दाबून टाकण्याची, त्यांचा पडसाद आपल्या चेहऱ्यावर मुळींच उमटूं न देण्याची धडपड, अन् जगाची फाजील पर्वा करतांना बनलेली निर्जीव वृत्ती.

एकदा वाटे स्पष्टपणे सर्व गोष्टी तिच्यापुढं बोलून टाकाव्यांत. पण लगेच माझे हे विचार चुकीचे असं यांचें मला वाटून चुके अन् मन अधिकच विषण्ण होई. कारण आजपर्यंत मी त्या गोष्टी तिजपुढं पारायणें थोडीं का केली आहेत? मागं जें झालं तेंच आतां. नाहीं का?"

लता! त्या दिवशीची रोजनिशी मी इथंवरच थांबविते. त्यानंतर त्यांनी मांडलेल्या विचारांची कल्पना ती न वाचतां तुला करतां येईल. म्हणून ती हृदयभेदी वाक्यं इथं उधृत करून, आधीच विषण्ण झालेल्या तुझ्या मनाला अधिक दुःख देऊं इच्छित नाही. त्याची जरूरीही पण नाही. कारण न सांगतां जर सर्व गोष्टीचा बोध होत असेल, तर त्या गोष्टी सांगण्यांत काय हंशील?

दुसऱ्या पानावर त्यांनीं लिहिलेलें आहे-

मला इथं येऊन आज तीन चार दिवस झाले. पण लता मला एकदां तरी भेटली असेल तर शपथ. माहेरी असतांना साऱ्या मुली आपल्या पतीशीं अशाच वागत असतील कां ?

लताच्या या वागण्याला काय म्हणावं ?

मी तिला दोन चारदां मला भेटण्याविषयीं गड्याबरोबर निरोप धाडला. पण तिनं तिकडं कधीं लक्ष दिलं असेल तर शपथ. मला भेटायला तिला कांहींच कां निमित्त मिळत नव्हतं ? अन् मी म्हणतो त्याला कांहीं तरी निमित्त कशाला पाहिजे ? पत्नीला पतीशीं भेटायला ....

आजचीच गोष्ट ! गड्यानं, लता वर एकटीच वेणीफणी करीत असल्याचं सांगितलं. मी हळूच जिना चढून वर गेलो. तो वेणीफणी आटोपून ती खालीं जाण्याच्या विचारांत होती.

मी चटकन् पुढं होऊन तिचा हात घट्ट पकडून म्हटलं, "या तीन दिवसांत एकदांही भेटायला सवड झाली नाहीना राणीसाहेबांना ?"

"कांहीं तरीच" आपले हात माझ्या हातां-

तून सोडवून घेत ती म्हणाली, " कुणी तरी पाहिलं तर ? "

आतां मात्र मी चिडलों, संतापलोंही. अन् तिचा हात झिडकारून म्हणालो. " तर काय होईल ? "

" काय तरी बाई इकडचा स्वभाव. एवढी साधी गोष्ट कळत नसतांना बॅरिस्टर कसे झालांत कुणाला ठाऊक ! "

" माझा प्रश्न असा चेष्टेवारी नेऊं नकोस तूं लता, " मी रागानेंच म्हणालों. "प्रथम मला सांग. तुला यावेळीं अन् तेही इथं माझ्याबरोबर बोलतांना कुणी पाहिलं तर काय होईल ? "

माझ्या रागीट चेहऱ्याकडं लक्ष जातांच तिचा चेहरा कष्टी झाला. ती सद्गदीत कंठानं म्हणाली, " असं रागवायचं काय गडे ! "

" ते कांहीं नाहीं. आधीं मला माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालंच पाहिजे." माझा राग कायम होता.

" त्यांत काय उत्तर द्यायचं ? लोक नांवं नाहीं कां ठेवणार ? "

तेच ठराविक उत्तर, नी तोंच ठराविक अभिनय.

मी तिला निमुटपणें खालीं जाऊं दिली. अन् कॉटवर अंग टाकून स्वस्थ पडून राहिलो.

माझी खात्री झाली कीं, तिची मनोभूमिका मला हवी तशीं तयार करणं माझ्या हातून शक्य नाहीं.

अशक्य! अशक्य कोटीतील गोष्ट आहे ती.

मग काय! आमचं हें असंच चालायचं?

लता, काय वाटत तुला ही पान वाचल्यावर? तुझ्या पतीचं दुसऱ्या कुणावर प्रेम असल्यामुळं, ते तुजविषयी अनास्था दाखवितात हे, की तं तुझ्याच मूर्खपणामुळ तुजविषयीच्या त्यांच्या उत्कट प्रेमाला काजळ फासलं आहेस हे?

वेड! तूं तुझ्या जातीयांधनांची, समाजाची पर्वा ही करायला हवीच; तुझ्या घरांतील वडील धाऱ्या मंडळींच्या आवडीनिवडीकडे पहायला हव. पण ते केव्हां? ते तुझ्या पतीच्या आवडीनिवडीच्या आड येत नसेल तर! तुम्ही तुमच्या संसाराचा गाडा हांकत असता, त्यामुळं वाटेंत खाचखळगे उत्पन्न होत नसतील तर! तुझा संसार जर सुखी होत नसेल तर काय करायचं आहे तुला लोकांची फाजील पर्वा करून?

लता, तुझा समाज कितीतरी मागं आहे. तुझे पति कितीतरी पुढं गेले आहेत. अशा पतीशी वागतांना तूं जर कां जुन्या चालीरितींना चिकटून राहूं लागलीस तर तें सुधारणाप्रिय अशा तुझ्या पतीला मुळींच रुचणार नाही. त्यामुळं तुझ्या पतीचा तुजविषयीचा आदर दिवसेंदिवस नाहीं कां कमी होणार ?

खरी वस्तुस्थिति अशी असतां, तुझे पति अलीकडं तुजबरोबर मोकळेपणानं वागत नसल्याचं, खुल्या दिलानं बोलत नसल्याचं कारण मी वर विदित केलेल्या गोष्टींत असतांना, तूं त्याचं कारण तुम्हां दोघांमधील असलेल्या शिक्षणांतील फरकाकडं लावून, त्यांचं प्रेमच आपल्यावर नसून दुसऱ्याच एका स्त्रीवर असल्याचा वर शिक्का मोर्तब करुन, तूं स्वतःच्या मनाची फसवणूक करून घेत आहेस. अकारण आंतल्या आंत झुरून स्वतःचा घात करून घेत आहेस.

लता ! तूं डोळस हो. संशयाची झापड काढून टाक. अन् गेल्या सर्व गोष्टी विसरून, आजच लग्न झाल्याप्रमाणं तुझ्या पतीशी वागायला लाग. त्यांच्या आवडी निवडी जाणलेली तूं, त्यांच्या जीवनाशी समरस हो की, यक्षिणीनी कांडी फिरविल्याप्रमाणं तुझ्यांत एकाएकी झालेला फरक चटकन् तुझ्या पतीच्या निदर्शनास येऊन, त्यांना त्याचं महदाश्चर्य वाटूंदे.

मग पहा. तुला पाहतांच त्यांचा चेहरा नेहमीं आनंदी राहतो की नाही ते. मग त्‍ तुझ्या-बरोबर मन मोकळेपणानं बोलत नसल्याची, नेहमीं बरोबर घेऊन सिनेमा, नाटकांस, फिरावयास जात नसल्याची तक्रारं मुळीच राहणार नाही. इतकंच नव्हे तर माझ्या सारख्या मैत्रीणी तुजकडं वरचेवर येऊं लागल्या की, तूं नाक मुरडूं लागशील अन् मनांतल्या मनांत म्हणशील, " एवढं देखील कस कळत नाही यांना कुणाला ठाऊक ! "

असं झालं तर मला आनंद होईल बरं कां लता !

पण तसं झालेलं मला केंव्हां पहायला मिळल बरं ?

— संज्ञा

लिग्वाण ता. १४।१०।३९

# तारुण्याची-भूक : : ४

नाना,

अमावास्येची रात्र. बाहेर घनदाट काळोख पसरला आहे. नाही म्हणायला दुकानापुढचा ग्रामपंचायतचा बारिकसा दिवा मिण् मिण् जळतो आहे. त्यानं चोहों-बाजूला पसरलेल्या निबिड अन्धःकाराची तीव्रता कमी होण्या ऐवजी अधिकच जाणवत आहे.

त्या दिव्याकडं पहात मी बसलो आहे. तुम्हांला वाटेल मी वेडाच झालो असलो पाहिजे. नाही नाना, [illegible] लोक एकमेकांकड ओढले जातात; निदान एकमेकांबद्दल एकमेकांना सहानुभूती वाटते, असं मी कुठसं वाचलं आहे. पण समपरिस्थितीतील दोन भिन्न जातीय निसर्गाचे घटक एकमेकाकडं सहानुभूतीनं पहात असतील ही गोष्ट मला आतापर्यंत ठाऊक नव्हती.

पण बाहेर जळणाऱ्या दिव्यानं ही गोष्ट माझ्या निदर्शनास आणून दिली. निराशेनं भारलेल्या दृष्टीनं मी त्याच्याकडं पहात असतां, ' वेड्या ! इतकं कष्टी कशाला व्हायला हवं ? निराशा ही काय चीज आहे ह्मणून, तुझ्या सारख्या उमद्या तरुणानं विचारायला हवं. माझीच गोष्ट घे. बाजूला घनदाट अन्धःकार पसरला असतांना मी नाहीं कां टिकाव धरून राहिलों ? मग तूं कां इतका घाबरून गेला आहेस ? सर्व जैन समाज एकीकडं आणि तूं एकीकडं अशी आज तुझी स्थिती आहे हें मी जाणून आहे. पण त्यामुळं तूं इतका घाबरून न जातां, भय-चकित न होतां, माझ्याप्रमाणंच धीरानं आलेल्या संक-टाशीं तोंड द्यावयाला नको कां ? " असं जणूं काय तो मला धीर देत आहे. तो मला विपन्नावस्थेतही टिकून राहणारा जिव्हाळ्याचा मित्र वाटतो; मग मी त्याच्याकडं निश्चल नजरेनं पहात राहिल्यास नवल ते काय ?

या दिव्यानं दिलेला मूक संदेश मला पटतो; अन् त्याप्रमाणं मी वागण्याचंही पण ठरविलं आहे. माझी पर्वा न करणाऱ्या, माझे विचार ऐकून घेणेस देखील तयार नसणाऱ्या, आणि माझ्या भावनांचा चुराडा कर-णेस एका पायावर तयार असणाऱ्या, आपल्या निर्घृण-समाजाची पर्वा यापुढं मी मुळींच करणार नाही. समा-जांतील कांहीं प्रतिष्ठित भेंडांनीं मला जाती बाहेर ठेवलं

म्हणून मुळींच विषाद वाटत नाही. आजपर्यंत तरी कुठं मी जातीत होतो ? असून नसल्या सारखाच नव्हता कां ? मिळमिळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्यच बरं.

पण नाना, तुह्मी माझ्यावर रागावलांत, तुमची माझ्यावर अवकृपा झाली, तुह्मांला मी विश्वास घातकी वाटलों, फार काय तुमच्या दृष्टीनं मी पतित ठरलो, या एकाच गोष्टीमुळं मी बावरुन गेलो आहे. एखाद्या भ्रमिष्ठा-सारखा इकडून तिकडं येरझारा घालतो आहे. फार काय ढसढसा रडतो आहे.

जन्मतांच आई वारली. मी दोन वर्षांचा होतांच बाबाही मला सोडून गेले. मित्र प्रेमाला जागून तुह्मी माझं पोटच्या पोराप्रमाणं पालन पोषण केलंत. स्वतःची हलाखीची स्थिती असतांही तुह्मी माझं प्राथमिक शिक्षण पुरं केलंत; अन् मग एखाद्या मराठी शाळेंत मास्तरची नोकरी मिळण्याबद्दल आपण आटोकाट प्रयत्न केलांत. पण वशिल्याच्या या दिवसांत मी हुशार असतांही, त्या जागेस योग्य असतांही, मास्तर होऊं शकलो नाही. माझा निरुत्साह झाला. आपल्यालाही पण अतिशय वाईट वाटलं. "दुर्दैवी आहेस बापडा" म्हणून तुह्मी माझ्या प्रारब्धाला दोष दिलांत.

पण त्यामुळं कांही माझ्या पोटापाण्याचा प्रश्न सुटणार नव्हता.

तुम्ही आपल्या पोटाला चिमटे देऊन शंभर रुपये मला व्यापाराकरितां दिलांत, आणि आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यास मला सांगितलांत.

नाना, तो प्रसंग मला चांगला आठवतो. माझ्या मनःचक्षूसमोर जसाच्या तसा उभा राहिला आहे. माझ्या काळजावर कोरला गेला आहे.

मी त्या दिवशी तुमच्या घरातून बाहेर पडणार होतो. किराणी दुकान घालून द्रव्योपार्जन करण्यासाठी बाहेर पडणार होतो, आणि आपल्या पितृतुल्य आसन्याला पारखा होणार होतो. माझ्या हृदयाला किती यातना होत होत्या, आपल्यालाही पण होत होत्या. आणि आपण दोघेही मुक्तकंठाने कितीतरी वेळ अश्रू ढाळीत होतो.

नाना, शकुन्तला कण्वाच्या आश्रमांतून बाहेर पडून सासरी जाते वेळी, त्या दोघांना झालेल्या दुःखाचं जें वर्णन कालिदासानं केलेलं आहे, तें किती यतार्थ आहे याची पुरी कल्पना मला आली त्यावेळी. मीही सासरीच जात होतो, पहिल्यांदा सासरी जात होतो. त्यावेळेपर्यंत आपल्या जिवावर निष्काळजीपणाने आयुष्य कंठणारा मी, स्वतःच्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी घराबाहेर पडणार होतो.

मी आपणांस नमस्कार करून घराबाहेर पडतें-वेळीं, आपण सद्गदित कंठानं मला आशिर्वाद देऊन काढलेले उद्गार माझ्या हृदयावर जसेच्या तसे कोरले गेले आहेत. आपण त्यावेळीं मला म्हणालांत, " दिलीप ! माझ्या पोटच्या पोराबद्दल जितकं मला प्रेम वाटत नाही, तितकं प्रेम मला तुजबद्दल वाटतं. त्या प्रेमाची फेड तूं आपल्या चांगल्या पितृतुल्य वागण्यानं केलीस. मी सांगेन त्याप्रमाणं आजपर्यंत वागत आलास.

दिलीप ! तूं हुशार आहेस. निर्व्यसनी आहेस. आणि प्रयत्नवादीही पण आहेस; आणि ह्मणूनच तूं आपल्या धंद्यांत खात्रीनं यश मिळवशील असं मला वाटतं. पण ध्यानांत ठेव कांही झालं तरी सदाचार सोडूं नकोस. आपल्या वडिलांच्या नावाला कालिमा लागेल, माझ्या [illegible] उपदेशाला बाध येईल, अशी कोणतीही गोष्ट करूं नकोस. देव तुला सद्बुद्धि देवो. "

आपला तो उपदेश मी सदोदित मनाशीं बाळगित आलों आहे. देव जाणे इतकेंच मी तें पवित्र मानीत आलों आहे. मजकडून मी त्याला आजपर्यंत मुळींच बाध आणूं दिला नाहीं.

पण आपणास वाटलं कीं, मी आपला उपदेश विसरलों, दुःशील बनलों, सदाचार सोडलों, अन् नाना, त्यामुळं तुम्हाला माझा राग आला. वैतागाच्या भरांत

मी आपल्या अन्नास न जागल्याचं कल्पून, आपण फिरुन माझं तोंड देखील न पाहाण्याची प्रतिज्ञा केलीत आणि म्हणूनच मला वाईट वाटलं. मी खूप रडलो. मला माझ्या कृतकृत्याबद्दल पश्चात्ताप वाटला म्हणून नव्हे, माझं आचरण अपवित्र असल्याची माझी खात्री झाली म्हणून नव्हे, तर माझ्या गुरुला, मी प्रत्यक्ष परमेश्वराच्या ठिकाणीं कल्पून भक्तिभावानं पुजणाऱ्या आपणांला, माझं वर्तन गर्हणीय वाटलं, आणि आपली माझ्यावर अवकृपा झाली म्हणून.

नाना ! मी ज्यावेळी दुकान थाटतो त्यावेळी वीस वर्षाचा असेन. माझं नुकतंच तारुण्यांत पदार्पण होतहोतं. आपल्या समाजांतील इतर मुलांच्या दृष्टीनं विचार केल्यास मी लग्नाला केंव्हांच योग्य झालो होतो. पण आजपर्यंत माझं लग्न होऊं शकलं नाही. त्याचं कारण माझ्याप्रमाणंच तुम्हीहि जाणतां.

माझ्यासारख्या निर्धनाला कोण आपली मुलगी देणार

त्यावेळी कुणी ती देऊ केली असती, तरी मी मुळीच पत्करली नसती. लग्न करावं, विषयसुखाचा अनुभव घ्यावा, असं मला वाटत नव्हतं असं नव्हे. पण ती भूक इतकी तीव्र स्वरूपाची नव्हती. माझ्या पोटाच्या भुकेच्या भाराखालीं ती दडपली गेली होती.

पण पुढं जसजसं पोटाच्या भुकेचं दडपण कमी होत गेलं, तसतसं त्या भुकेचं अस्तित्व मला जाणवूं लागलं. मी हातीं घेतलेला धंदा फलदायी झाला होता. पांच वर्षांच्या काळांत मी आपले पैसे परत करून, माझ्या पोटाचा प्रश्न सोडवून, दुकानांत दोन-चारशेंचं भांडवल गुंतविलं होतं. आपण अधिक मिळवूं अशी मला खात्री वाटत होती. अशा रीतीनं मी माझ्या एकस्याच्या पोटाचा प्रश्न तर सोडविला होताच पण दुसऱ्या जिवाला पोसण्याची माझी तयारी झाली होती.

मी त्या दिशेन खूप प्रयत्न करून पाहिला. पण मला आपली मुलगी देणेस कुणीही तयार नव्हता. त्यांना मुलीच्या अंगावर हजार पंधराशेंचे दागिने हवें होते.शिवाय लग्नांत पांचसहाशें रुपये खर्च करायला पाहिजे होते, पण एवढा पैसा खर्च करण्याचीं माझी ऐपत नसल्यामुळ, आपली मुलगी मला देणेस कुणीही तयार नव्हता.

नाना ! आपल्या समाजांत हल्ली मुलींची संख्या अधिक नी मुलांची कमी असल्याची ओरड करण्यांत येते. ' मुलांची ' या शब्दाची व्याख्या श्रीमंत, सुखवस्तु, अशीच करायची काय ? तसं नसतं तर माझ्यासारखी कित्येक मुलं डोळ्यासमोर दिसत असतां, ती लग्नावाचून मुलींच राहिली नसती. आमच्याकडं कुणाचंही लक्ष

जाऊं नये, फार काय मुद्दामच तिकडं दुर्लक्ष केलं जावं हें काय दर्शवितं?

सौंदलग्याच्या अण्णाचीच गोष्ट घ्या. दोन-लाखाची इस्टेट असेल त्यांची. पोटीं तीन मुलीं, पुत्र-संतती नाही; अन् मुली कुरूप असल्यानं दत्तक न घेतां आपली सारी इस्टेट आपल्या तिन्ही मुलींत वाटून देण्याची त्यांनी आपली मनिषा जाहीर करतांच, मी मी ह्मणणाऱ्या श्रीमंत मुलांच्या, त्या मुलींवर उड्या पडल्या. अण्णांनी अशाच मुलांची निवड केली. पैशाकडं पैसा गेला. नाना! त्यावेळी मी त्यांना दिसत नव्हतों कां? त्यांनीं निवडलेल्या तीनही मुलांपेक्षां मी—थोडासा विनय बाजूला ठेवून बोलायचं झाल्यास—अधिक हुशार, सुंदर सदाचारी नाहीं कां?

आपल्या मुलीच्या करितां श्रीमंत जांवई न शोधतां माझ्यासारखे गरीब पण हुशार मुलांना जांवई ह्मणून पत्करून तीन गरीबांचीं घरं उभारली असती तर काय बिघडलं असत? पण इकडं त्यांचं लक्ष जाईल तेंव्हांना!

तसंच श्रीमंत, बिजवर, किंवा तिजवरांच्या गळ्यांत आपल्या कोंवळ्या मुली बांधण्यास तयार असणाऱ्या मुलींच्या बापांना, तरणीबांड पण दुर्दैवानं गरीब असलेली मुलं दिसत नाहीत.

लग्नाच्या पायीं पांच पांच दहा दहा हजार रुपये खर्चं करणारे हरींचे लाल, आमच्या सारख्यांच्याकडं ढुंकूनदेखील पाहणार नाहीत. अनाठायीं खर्ची होणारा पैसा आपल्या मुलींसकट आमच्या सारख्यांना देऊन, त्यांचे संसार थाटून, घर उभारण्याचं महद्‌पुण्य पदरीं बांधून घ्यावं असं एकाला तरी वाटतं कां ?

नाना ! माझ्यापुढं नागडी हिंडणारी शेंबडी पोरं, आज बोहोल्यावर चढतांना पाहून मला काय वाटत असेल याचा तुम्ही कधीं विचार केला आहे कां ? माझ्या वयाची मुलं लग्न करुन, संसार थाटून, चार चार मुलांचे बाप झाल्याचं पाहून, माझ्या मनाला किती यातना होत असतील ! भावना दुखविल्या जात असतील ! याचा कधी कुणी विचार केला आहे कां ?

तुम्ही म्हणाल, " तुझ्या नशीबांत नाही त्याला कोण काय करणार ? ऐष आरामांत लोळणाऱ्या श्रीमंताकडं पाहून काबाडकष्ट करून अर्धपोटी जीवन कंठणाऱ्या मजुरानी त्यांच्या नांवनं बोटं मोडण्या सारखं आहे हें ! "

नाना ! ऐष आरांमात लोळणाऱ्या श्रीमंताकडे पाहून असूयेनं बोटं मोडणं कदाचित् गर्हणीय ठरेल पण त्यांच्याप्रमाणं पोट भरुन जेवाव असं गरिबांना वाटणं सहाजिक नाही कां ? सरळ मार्गानं जाऊन

झाडाची काडं केली असतांही, अहोरात्र प्रयत्न केला असतांही जेंव्हां कां भूक शमत नाहीं, तेंव्हा जर कां त्यानीं ती भूक शमविण्यासाठीं सर्व मान्यमार्ग सोडून देऊन एकाद्या आड मार्गाचा अवलंब केला तर तो दोष कोणाचा !

माझ्या मतें तारुण्याचीं भूक ही पोटाच्या भुकेहूनही फारच तिखट आहे. तक्ष्ण आहे. पोटाची भूक शमली नाहीं, तर गात्रं शिथिल होतात अन् त्याचा परिणाम शरिरावर झालेला जरी चटकन् दिसला नाहीं तरी अंतरंगावर होतो. नी मनुष्य झिजून झिजून मरतो. आतां तुम्हीच सांगा या दोन्हींतील तीव्र कोणती ?

नाना ! ही तारुण्याची भूक मला लागली होती. ती शमविण्यासाठीं काय करावं हें मला सुचत नव्हतं. आपला उपदेश सदोदित दृष्टी समोर असल्यानं स्वैराचाराकडं माझी प्रवृत्ती वळत नव्हती, पण लग्न होण्याची, आपल्या जातितिलि मुलिशीं लग्न होण्याची आशा तर दिवसेंदिवस नाहींशी होत होती. माझ्याभुकेची तीव्रता तर दिवसोंदिवस वाढत होती.

ही भूक शमविण्याचा मला एकच मार्ग आढळला. जो. मला पापी वाटला नाहीं कीं अधोगतीला पोहोंचविणारा दिसला नाहीं. एका खेडवळ पण निष्पाप

मुलीशीं मी संसार थाटला. यांत कांहीं वाईट गोष्ट केली असं मला वाटलं नाही. आजदेखील वाटत नाही.

असं असतांहीं आपल्या समाजाला माझं कृत्य पापी वाटलं. पण मला पापी ठरविणारा हा समाज तरी शीलवान आहे कां ? माझं कृत्य वरं वाईट ठरविणाऱ्या आपल्या समाजांतील मोठ मोठाल्या पुढाऱ्याकडं पहा, ते बाळासाहेब ! घरीं पत्नी रडत असतां, पति सुखाकरितां तळमळत असतां, दररोज न चुकतां वेश्येच्या घरचें उंबरठे झिजविणारें ते — माझया वर्तनाची चौकशी करण्यासाठी त्यानीं जोरान पुढ सरसावावं ? कां श्रीमत आहेत म्हणून ? लोकांत प्रतिष्ठित म्हणून मिरवायला मिळतं म्हणून ? सर्वांना हे ठाऊक असताहीं कुणीही त्यांच्या आचरणाविषयीं तोंडातून ' ब्र ' शब्द काढुं शकत नाही म्हणून ?

अशीं उदाहरणं आपल्या समाजांत, फार काय आपल्या इथंच कितीतरी आढळतील. या धेंडांचा एकही दिवस पर-स्त्री गमना शिवाय जात नाही, तरी ते समा— जांत प्रातीष्ठित म्हणून मिरवितात, माझ्या सारख्या निष्पाप, निष्कलंक पण गरीब तरुणाच्या कृत्याचा निवाडा करण्याचा त्यांना हक्क पोहोंचतो. फार काय त्याला ते आपल्या हुकमतीच्या जोरावर बहिष्कृत ठरवून माणसा- तून उठविणेस देखीर मागं पुढं पहात नाहींत. यापेक्षां

दुसरी समाजघातकी, सत्यास जाणून बुजून न्यायाच्या-पांघरुणाखालीं असत्य ठरविणारी गोष्ट ती कोणती ?

कोळसा कितीही उगाळला तरी काळा तो काळाच. पण नाना! आपल्या दृष्टीला, आपल्या निष्पाप-दृष्टीलाही, माझं कृत्य पापी दिसावं हें नवल नव्हे कां ? आश्चर्यांतील आश्चर्य नव्हे कां ?

सर्वांहून याचंच मला दुखः होत आहे. नाना ! तुम्ही जर कां मी केलेलं बरोबर केलं असं म्हणाल, माझ्या डोक्यांवर पूर्वीप्रमाणंच आपला वरद-हस्त ठेवाल, तर मी समाजाला न जुमानतां याही संकटांतून वाट काढेन. आणि समाजांतील प्रतिष्ठित बदमाषांना दाखवून देईन की, समाजाला जर कां मी नको असेन तर समाजाचीही पण मला जरुरी नाही.

—दिलीप.

लिखाण ता. २१।१०।३९

# मुलगी आणि सून : : ५

शशी,

गेल्या महिन्यात जेव्हां का मी पहिल्यांदा सासरी जाणेसाठी निघाले तेव्हां तूं खवचटपणें म्हणालीस, " सुमा, गेल्याबरोबर पत्र धाड ह! नाहीतर आपल्याच सुखांत गर्क होशील नी विसरशील मला. "

मला तुझे उद्गार आवडले नाहीत. म्हणून मी किंचित फणकाऱ्यानच म्हणाले, " बरं, बरं, कळला शहाणपणा. "

त्यावेळीं मला वाटत होत, मी माझ्या सुखांत कितीही रंगले, माझ्या नवीन वातावरणांत कितीही समरस झाले, म्हणून मी तुला, माझ्या लाडक्या शशीला, माझ्या जिव्हाळ्याच्या मैत्रिणीला विसरेन, छे! शक्यच नाहीं तें मुळीं. त्याच वेळीं मी माझ्या मनाशी ठाम निश्चय

केला, " मी शशीला न चुकतां दर आठवड्याला एक पत्र लिहीत जाणर ! "

पण शशी, मी इथं येतांच, येथील लोकांच्या स्वभावाची मला ओळख पटतांच, अकल्पनीय अशा कितीतरी गोष्टी मला आढळल्या, अतर्कनीय अशा कित्येक गोष्टी मी अनुभवल्या, पाहिल्या नी ऐकल्या. त्यामुळं माझं मन गोंधळलं. माझ्या डोक्यांत विचाराचं वादळ उठलं. मी बांधलेले कित्येक मनोरे ढासळले, नी मी किंचित बावरलेही.

या माझ्या प्रक्षुब्ध मनःस्थितिमुळ मी कित्येक जरुरीच्या गोष्टी करणेस देखील विसरले. त्यांत तुला लिहावयाच्या पत्राचं आलंच.

शशी ! लग्नानतर पहिल्यांदा जेंव्हां कां मी सासरीं येण्यासाठीं निघालें, तेंव्हां आई मला आपल्या हृदयाशी घट्ट कवटाळून धरून, गद्गदित कण्ठानं ह्मणाली. " सुमा ! तूं हुशार आहेस. तुझ्या सासरच्या मंडळीशीं तूं कसं वागावंस हें कांहीं मी तुला सांगायला नको, पण आईचं हृदय, सांगितल्याशिवाय राहावत नाही. कोणत्याही बाबतीत चढाईचं धोरण धरूं नकोस. नमतं घेऊन वागत जा. आमचा उद्धार न होईल अशा तऱ्हेचं वर्तन ठेव ह्मणजे झालं. "

आई अतिशय कळकळीनं बोलत होती. हें मला

कळत होतं म्हणून मी तिला तिच्या उपदेशाप्रमाणं वागण्याचं अभिवचन दिलं. नि त्या प्रमाणं मी माझं वर्तन ठेवलंही.

पण माझं मन दिवसोंदिवस कष्टी होऊं लागलं. मला सारखा मुका मार सहन करावा लागूं लागला. माझ्या मनाला नसती चुटपुट लागून राहिली.

शशी ! मी इथं येतें न येते तोंच माझ्या सासर-च्या मंडळींनीं माझ्यावर कित्येक बंधनं लादली. आपल्या आवडी निवडीप्रमाणं माझ्या आवडी निवडी बनविण्या-बद्दल हुकूम केला.

आईचा निघते वेळचा उपदेश माझ्या ध्यानीं असल्यामुळं, सासरच्या मंडळींचा मजविषयी अतिशय चांगला ग्रह व्हावा म्हणून, मी त्यांच्या इच्छेप्रमाणं वागूंही लागलें. इतकंच काय, माझं म्हणणं खोटं नी त्यांच म्हणणं खरं असंही पण दर्शवूं लागले. त्यामुळं माझ्या मनाचं समाधान होईना, फार काय नेहमीं माझ्या डोक्यांत विचारांच वादळ उठे. या ना त्या रीतिनं मी स्वतःची समजूत घालण्याचा प्रयत्न करी. पण माझा प्रत्येक प्रयत्न फसे नी मी स्वतःची फसवणूक करून घेत आहे अस मला वाटे.

पण माझे विचार दुसऱ्याजवळ बोलण्याची देखील चोरी. प्रांजल विचार म्हणून देखील त्याची

गोप्यता कुणाजवळ केल्यास, त्याचा विपर्यास होण्याचीच भीती अधिक. अन् तसं झाल्यास माझ्यावर कसलं संकट ओढवेल हे सांगणं फारच कठीण.

पण तुला, माझ्या जिवाभावाच्या मैत्रिणीला, की जी माझं गुपित इतरांच्या जवळ बोलून दाखविणार नसल्याची मला पुरी खात्री आहे अशा माझ्या शशीला, पत्र लिहितेवेळीं मला माझ्या मनांतील विचार बोलून दाखविलेच पाहिजेत.

शशी ! मी इथं आल्यावरती माझं वागणं पूर्ववत ठेवलं होतं. मी स्वतःच्या घरांत आहे असंच समजत होते. फरक इतकाच की मी आतां आई-बाबांच्या सहवासांत नसून, सासू सासऱ्यांच्या सहवासांत होते. पण याचं मला कांही इतकंस वाटत नव्हतं. त्यांना मी त्यांच्या मुली सारखीच या समजूतीनं मी माझ्या बाबांच्या घरीं जशी मोकळ्यामनानं बोले, चाले, पेहराव करी, तसाच आतां करूं लागले. पण चार आठ दिवसाचा काळ लोटतो न लोटतो तोच घरांत कुजबूज सुरू झाली. अन् नंतर तर माझ्यातील कित्येक गोष्टी आपणांस पसंत नसल्याच त्यांनी मला सांगितलं. प्रथम प्रथम मी या गोष्टीकडं कानाडोळा केला. पण त्याचा कांही उपयोग झाला नाही, उलट मी बाहेर जातेवेळीं पायांत चपला, कानांत डूल घालणं किंवा तोंडाला स्नो पावडर फासणं, सासू

सास यांच्या देखत पतीशीं बोलणं, त्यांच्या बरोबर फिरायास किंवा सिनेमास जाणं, इत्यादि गोष्टी अमर्यादशील आहेत, अशी त्यांची नेहमीं माझ्या विरुद्ध ओरड होऊं लागली. मला यांत कांहीं छचोरपणा किंवा मर्यादेचं उल्लंघन दिसत नव्हतं. तरीही केवळ सासरच्या मंडळींचं मन दुखवलं जाऊं नये, त्यांचा मजविषयीं वाईट ग्रह होऊं नये म्हणून मी त्यांच्या सांगण्याप्रमाणं वागूंही पण लागलें.

पण माझ्या मनांत फिरफिरून एक विचार येऊन जाई. माझ्या सासरच्या मंडळीना खरोखरच वरील गोष्टी आवडत नाहींत कां ? कां त्या मी—त्यांच्या सुनेनं-तेंवढ्या केलेल्या त्यांना आवडत नाहींत ?

शशी, माझ्या वन्सनां त्यांनी मागण्याचा अवकाश की, स्नो पावडरच्या बाटल्यावरबाटल्या आणून देणाऱ्या सासूबाई, मी तोंडाला स्नो लावतांच कां आकांड तांडव करतात? बाहेर जातेवेळी माझ्या नणंदेन पायात चपला न घालतां फिरु नये म्हणून, फिरफिरून सांगणारे काकाजी, मी बाहेर जातेवेळी चपला घालतांच कां तोंड वाकडे करतात ? आपल्या देखत आपल्या मुलीनं तिच्या नवऱ्या बरोबर खूप बोलावं, मन मोकळं करून हंसावं, हिंडावं, सिनेमाला जावं, म्हणून इच्छिणारे मामांजी, मी माझ्या पति बरोबर अगदीं जरुरी पुरतं बोलतांच कां नाक मुरडतात ? त्यांच्या विचारांतील, आचारांतील,

उच्चारांतीलही विरोधांचं कारण जाणण्याचा मीं खूप प्रयत्न केला. पण विचांराअंती माझं असं ठाम मत बनलं कीं- या सर्वाचं मूळ त्यांच्या दृष्टींत आहे. आम्हां दोघांकडं-माझ्याकडं व वन्संच्याकडं—पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीकोनांत आहे.

वन्संच्याकडं पाहतांना त्यांची दृष्टी आपलेपणाचीं असतें. तर माझ्याकडं पाहतांना त्यांत परकेपणा स्पष्टपणें दृगोचर होतो. वन्संच्या सुखाकरितां — पोटच्या गोळयाच्या सुखाकरितां—झटतांना त्यांना स्वाभिमानाचीं, मर्यादेची आठवण रहात नाही. मायेच्या भाराखाली त्या पूर्णपणें दडपून गेलेल्या असतात. फार काय ते जाणून बुजून, त्या गोष्टी आपल्या मुलीच्या आवडी निवडीकरितां व सोडणेंस तयार असतात. पण सुनेला, त्यांच्या घरांत आलेल्या एका पोरक्या पोरीला, त्यांच्या मुलाशी लग्न बंधनानं जखडल्या गेलेल्या एका अबलेला, वागवितेवेळी त्यांचा मालकी हक्क उद्भवतो. त्यांच्या वडीलकीची, मोठेपणाची त्यांना जाणीव होते. नि आपल्या हुकुमाचीं अम्मलबजावणी करण्यासाठीं ते फारच काळजी घेऊं लागतात. त्यांच्या आज्ञेचं उल्लंघन होण्याचा न अवकाश कीं जबरदस्त प्रायश्चित्त हे मिळालंच.

शशी ! याच कारणास्तव सुनेंत नी सासूंत सहसा सलोखा नांदल्याचा आपणांस दिसत नाहीं; प्रेम नांदत

नाहीं, दोघींनांहीं एकमेकांबद्दल जिव्हाळा वाटत नाहीं. माझ्या प्रमाणं सर्व गोष्टी जाणून बुजून विसरण्याचा जी प्रयत्न करेल, तीच तंटयाविना काळ कंठू शकेल. पण सून जर कां अडदाण्ड नी शेरास•सव्वाशेर या न्यायानं वागणारी असली, कीं आटोपलाच बाजार. सासू सुनांत खटके हें उडायचंच, बोलाचाली ही व्हायचीच, असमाधान हे नांदायचंच; मग एकाच्या दोन चुली झाल्यानाहीं तरच नवल !

पण इकडं जुनी पिढी लक्ष देईल कां ?

—सुधा.

लिखाण ता. २८।१०।३९

# अबला : : ६

**बाबा,**

हे पत्र तुमच्या हातां पडेल त्यावेळी तुमची मनःस्थिती किती प्रक्षुब्ध झालेली असेल याची मला पुरी कल्पना असल्यानं, तुम्ही तें शेवटपर्यंत वाचाल कीं नाहीं याविषयीं मला मोठी धास्ती वाटते. मजवर अतिशय संतापलेले तुम्ही, त्याची रवानगी केराच्या टोपलींत न करांत म्हणजे झालं.

बाबा, परिस्थितीमुळ मनुष्याच्या स्वभावांत केवढा फरक पडतो हों ! पूर्वी एक आठवडाभर कां तुम्हांला माझं पत्र आलं नाहीं कीं बेचैन होऊन एकदम तार करणारे तुम्ही, गेल्या दोन चार महिन्यांत मी एकही पत्र लिहिलं नसतां, मी असहाय स्थितीत काळ कंठीत असल्याचं तुम्ही पूर्णपणें जाणत असतां, मला एकही पत्र पाठविलं नाहींत. माझी विचारपूस देखील केली

नाहींत. बाबा, मजवरची आपली माया एकाएकीं कशी नाहीशी झाली हो !

आई लहानपणींच वारली; नि माझे हाल होऊं नयेत म्हणूनं तुम्ही दुसरं लग्न केलं नाही. परगावी जावं लागल्यास, मला मावशीजवळ ठेवून जातेवेळीं तुमचा जीव सारखा वर खाली होत असे. अन् जर कां तुम्हाला एक दोन दिवस मला सोडून राहावं लागलं, की सारखे डोळे लागून राहायचे माझ्याकडे.

तुम्हीच गंमतीनं निवेदन केलेला एक प्रसंग आठवतो मला. माझ्या हृदयपटलावर कोरला गेला आहे तो.

कोर्टाच्या कामासाठी तुम्ही जिल्हाच्या गांवी गेला होता. तुमचं मजवर निरतिशय प्रेम असल्याचं जवळ जवळ आपले सर्व परिचित जाणत होते. अन् मला चार सहा दिवस सोडून राहावं लागल्यामुळं तुम्हाला वरचेवर माझी आठवण होणं साहाजिक होतं. आणि हे जाणूनच आपल्या गणूकाकांना तुमची चेष्टा करण्याची इच्छा झाली.

ते त्याच दिवशीं गांवाहून आल्यानं तुम्हांला म्हणाले, " सुषमेनं तुमचा ध्यास घेतला असून, सारखं रडून तिचे डोळे लाल झाले होते. "

तुमचं मन बेचैन करणेस तेवढी बातमी पुरेशी

होती. तुमच्या डोळ्यांत चटकन् अश्रू उभे राहिले. तेथील काम तसंच अर्धवट सोडून तुह्मी गांवीं निघून आलांत. मला आनंदित असल्याचं पाहिल्यानंतर तुह्माला समाधान झालं.

तुह्मी मला आपल्या जवळ घेऊन ह्मणालांत, " सुप्रभे, पोरी, तुला सोडून एक दिवसही राहणं माझ्या जिवावर येतं. पुढं तुझं लग्न झाल्यावर माझं कसं होईल कुणास ठाऊक ! "

" मी मुळीं लग्नच करणार नाही. "

तेंव्हां खूप मोठ्यांदा हासून नी माझे गालगुच्चे घेत तुम्ही म्हणालांत. " म्हणे लग्न करणार नाही. लग्नाशिवाय कां पोरीच्या जातीला राहतां येतं ? "
तुमच्या वाक्यांतील कनव चटकन् माझ्या ध्यानांत आली. स्त्री–जातीला लग्नावाचून आपलं जिणं कंठणं किती कठीण आहे, हेंच तुम्हांला त्या योगं माझ्या निदर्शनास आणून द्यायचं होतं.

तुमचं त्यानंतरचं वाक्य तर माझ्या हृदयाचा ठाव घेत गेलं. तुम्ही चेष्टेनं म्हणालांत, " लग्नापूर्वी साऱ्या उपवर मुली असंच म्हणत असतात. पण मनांत मात्र आपलं लग्न केंव्हां होईल याबद्दल विचार करीत असतात. "

तेंव्हां किती पण दचकले मी. मला वाटलं

तुम्हांला माझ्या मनांतील विचार कळले तर नाहींत! पण कांहींही न बोलणंच इष्ट वाटल्यावरून मी स्तब्ध राहिलें.

तुम्ही एकाएकी गंभीर झालांत. आणि माझ्या केंसावरून हळुवारपणें हात फिरवीत म्हणालांत, " सुखी हो बेटा ! "

आणि मला सुखी करण्याच्या इच्छेनं तुह्मी माझं लग्न केलंत, पण त्यामुळं मी सुखी झालें कां? याचा तुह्मी कधीं विचार केला आहांत कां?

कसा करणार? तुमच्या दृष्टीनं मी सौख्य सागरांत पोहत होतें. बॅरीस्टर झालेला पति मिळालेला, घरांत पिढीजात श्रीमन्ती, हाताखाली नोकर चाकर, हिंडायला मोटार, आणि छळायला नसलेली कजाग सासू, इतक्या सुखसोयी एकत्र जमून आल्यामुळंच तुह्मी दहा हजारांचा हुंडा ओतून मला या घरांत दिलीत. आणि सुटलांत माझ्या ऋणांतून.

पण बाबा, आपल्या दृष्टीनं अतिशय सुखांत लोळणारी आपली सुषमा, उन्हांत तडफडणाऱ्या माशा-प्रमाणं सारखी तळमळत होती याची तुम्हांला कल्पनाही नसेल; आणि मला पण माझ्या मनःस्थितीची कल्पना तुम्हांला करून देण्याचं धैर्य होत नव्हतं. लाज वाटत होती, भीती वाटत होती.

आणि मी सारखी आंतल्या आंत झुरत होते. लग्नापूर्वी–फुललेल्या कळ्याप्रमाणं टवटवीत दिसणारं माझं मुख सुकूं लागल्याचं तुम्हांला दिसलं नाहीं. मग मला आंतल्या आंत अतिशय दुःख होत असल्याचं कस कळणार ?

तुम्हांलाच काय पण कुणालाही त्याची कल्पना आली नाही. पण माझ्या चाणाक्ष नणदेनं मात्र ती गोष्ट ताडली.

वन्सं पहिल्या बाळंतपणासाठीं माहेरी आल्या होत्या. त्यांच्या डोहाळ जेवणासाठी आम्ही गांवाबाहेर असलेल्या आमच्या बागेंत चांदण्यारात्री वनभोजनासाठी गेलो होतो.

कसं अगदी पांढर शुभ्र चांदणं चंहुकडं पडलं होतं. आणि मी, वन्सं व शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या मुली बागेंत फिरत होतो.

पण माझं मन कशांत ह्मणून रमत नव्हतं. वन्संचं डोहाळ जेवण, त्यांच्या मैत्रिणींनी त्यांची आरभलेली चेष्टा, आणि वर आकाशांत तळपणारा पौर्णिमेचा चंद्र · · ·

माझ्या हृदयांत सारखी कालवा कालव सुरू झाली. तरीही त्याचं प्रतिबिम्ब माझ्या चेहऱ्यावर पडूं न देण्याचं मी प्रयत्न करीत होते.

आह्मी तलावाच्या कांठीं येऊन उमलत्या कम-लांच्याकडं पाहूं लागलो.

तोंच पाण्यांत पडलेल्या स्वतःच्याच प्रतिबिम्बाकडं वन्सं न्याहाळून पाहात असतां, शेजारच्या सुमित्राबाई ह्मणाल्या. "स्वतःच्याच प्रतिबिम्बाकडं इतकं न्याहाळून पाहायला नको कांही. लौकरच जिवंत प्रतिबिम्ब दिसेल कीं!"

वन्सं लाजल्या, आणि खुदकन् हांसल्याही.

पण माझा चेहरा खरकन् उतरला. आणि न कळत माझ्या तोंडातून एक दीर्घ निश्वास बाहेर पडला.

ही गोष्ट सुमित्राबाईच्या लक्षांत येतांच, त्या चेष्टेनं ह्मणाल्या. "तुह्मांला इतकं कांहीं कष्टी व्हावयाला नको सुषमाताई! तुह्मांला पण तुमचं प्रतिबिम्ब लवकरच दिसेल कीं"

साऱ्या जणी हांसल्या. पण मी फारच गंभीर झाले. कष्टी झाले. आणि माझं दुःख अश्रूंच्या रूपानं बाहेर पडेल अस वाटल्यानं, मी आलेला आंवढा गिळून बंगल्याकड वळले.

आणि खोलीत येतांच मी झटकन् खोलीचं दार आंतून बंद करून घेतलं आणि मुक्त कन्ठानं अश्रू ढाळूं लागले.

अर्धा तासाचा काळ लोटला असेल न असेल

तोंच खोलीचं दार ठोठावलं गेलं.

मला वाटलं माझे पतिराजच आले असावेत. माझ्या कपाळावर आंठ्या पडल्या. आणि माझा चेहरा बराचसा उग्र दिसूं लागला.

डोळे पुसून मी दाराची कडी काढली. आणि पाहते तो दारांत वन्सं उभ्या !

मी किंचित् दचकलेच.

आणि गोंधळलेल्या मनःस्थितींतच वन्सं मागून आंत आले.

खोलीचं दार बंद करुन घेऊन, माझा हात आपल्या हातांत घेत वन्सं म्हणाल्या, " वहिनी, मी तुम्हांला एक प्रश्न विचारू कां ? "

मी होकारार्थी मान हलविली.

" तुम्हांला इतकं दुःख कसलं होतं आहे ? "

दाबून ठेवलेला माझा हुंदका एकदम बाहेर पडला.

प्रेमळपणानं माझ्या पाठीवरून हात फिरवीत वन्सं म्हणाल्या, " दादा बरोबर नाहीं कां वागवित तुम्हांला?"

पण मी कांहीं बोलत नाहींसं पाहून त्या म्हणाल्या, "शपथ आहे तुम्हांला माझी वहिनी! मला आपली बहीण समजा, आणि खुल्या दिलानं आपलं दुःख निवेदन करा"

मला गहींवरुन आलं. आणि मी माझं दुःख त्यांना निवेदन केलं.

आणि ते ऐकतांच त्यांना महदाश्चर्य वाटल्यासारखं दिसलं.

बाबा, मगापासून मी ‘ माझं दुख ’, ‘माझं दुःख’ म्हणून कंठशोष करते आहे. पण ते दुःख कोणतं हेंच तुम्हांला कळवीत नाहीं. ते कळविण्याचं मला धैर्यच होत नाहीं मुळीं. स्त्री सुलभ लज्जेमुळं तुम्हांला देखील निवेदन करण्याचं आजपर्यंत मला धैर्य झालं नाहीं.

पण आज ... सर्व जग मला खायला ऊठलं असतां, जो तो आणि जी ती माझ्याकडं विचित्र नजरेनं पाहात असतां, मजविषयींचे अनुदार उद्गार प्रत्यक्ष माझ्या तोंडावर काढणेंस त्यांना मुळीच लाज वाटत नसतां, मी कां फाजील लाज बाळगावी ? त्यालाही कांहीं मर्यादा आहे की नाहीं ?

बाबा, या जन्मी मला माझ्या पतीपासून संसार-सुखाची अपेक्षा करतां येत नाहीं. त्यांच्याशीं पत्नीच्या नात्यानं बांधली गेलेली मी, लग्न होऊन पांच वर्षांचा काळ लोटला तरी, त्यांच्या बहीणी इतकींच तनानं मी पवित्र राहिलें आहे. स्पष्ट सांगायचं म्हणजे माझे पती जन्मतःच नपुंसक आहेत.

लग्नानंतर पहिले कांहीं दिवस मला ही गोष्ट कळली नाहीं. प्रथम मला वाटलं सहज सुलभ लाजेमुळं ते माझ्याशी प्रणयाचे खेळ खेळत नसतील. पण हें असंच किती दिवस चालणार? मला संशय आला. आणि मी त्याची शहानिशा केली तो माझा संशय खरा असल्याचं मला कळून चुकलं.

माझ्या हृदयावर जबरदस्त आघात झाला. माझा पोरकटपणा नाहीसा होऊन मी एकाएकी गंभीर बनले. त्यांना पहातांच नेहमीं हंसणारे माझे डोळे क्रुद्ध दिसूं लागले. त्यांच्याबद्दल माझ्या मनांत वसत असलेलं प्रेम, पूज्यभाव सारा नाहीसा होऊन, त्यांची जागा अत्यन्तिक रागानं, तिरस्कारानं घेतली.

तुम्ही ह्मणाल, त्यांच्यातील पुरुषत्व लग्नानंतर नाहींसं झालं असेल. नाहीं बर बाबा! ते जन्मतःच नपुंसक असल्याचं मला त्यांच्याकडून कळल. निसत्व मनुष्य खोटी गोष्ट देखील लपवूं शकत नाहीं. फार काय माझ्या डोळ्याशीं डोळा भिडविण्याचं देखिल त्यांनां धैर्य होत नसे, मग माझ्याशीं खाज्या गोष्टी करण्याची तर गोष्ट बाजूलाच राहो.

लग्नापूर्वी त्यानीं आपलं वैगुण्य आपल्या वडि-लांना कळविलं होतं. पण आपल्या प्रतिष्ठितेसाठीं, बॅरिस्टर झालेल्या आपल्या एकुलत्या एका मुलाचं

समाजांतील स्थान अढळ रहावं म्हणून त्यांच्या अनुभवी वडिलांनीं त्यांचं लग्न केलं. आम्हां स्त्रियांच्या स्वभावाची पुरी कल्पना असलेल्या त्यांना हें ठाऊक होतं कीं, कांहीं झालं तरी कुलवधू आपल्या पतीतील व्यंग दुसऱ्याला सांगणार नाहीं. ती गोष्ट चव्हाट्यावर आणणार नाहीं. फार झालं तर ती आतल्या आंत झुरेल, एकांतांत रडेल, आपल्या प्रारब्धाला दोष देईल, आणि झुरून झुरून एक दिवस मरून जाईल.

स्त्री स्वभावाची एक बाजू अजमावली होती त्यांनीं. तिच्याशीं चांगुलपणानं, निदान माणुसकीनं वागणाऱ्याशी ती अतिशय नमून वागेल, फार काय गोगलगाय देखील बनेल. पण तिच्यावर भयंकर अन्याय झाल्याचं कळून चुकतांच, आणि ती तिच्या सहनशीलतेची मर्यादा ओलांडून जातांच, ती निःसंग बनते. आणि मर्यादेचा पडदा झुगारून देते.

माझ्याही बाबतीत तसंच नाहीं का झालं ?

वन्संनां मी माझ्या दुःखाचं कारण सांगतांच, त्या मामंजींनां एकांतांत गांठून म्हणाल्या. "वहिनी कष्टी असल्याचं कारण कळलं कां तुम्हांला बाबा? गेले कांहीं दिवस मी बारकाईनं त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष देत होतें. माझ्या गर्भधारणेच्या कोणत्याही समारंभांत त्या उत्साहानं भाग घेत नव्हत्या. माझ्यावर त्यांचं

किती प्रेम ! पण कर्तव्य म्हणून त्या दरेक गोष्टींत लक्ष घालीत होत्या. याच्या बुडाशी तसंच कांहीतरी सबळ कारण असल्याचा मला दाट संशय आल्यानं, मी त्यांच्याजवळ चौकशी केली आणि त्यानी त्याचं कारण सांगतांच माझ्या छातीत धडकीच भरल्यासारखी झाली.

" कोणतं कारण सांगितलं तिनं ? " भीतभीत मामंजीनं प्रश्न केला.

" आपणांस संसारसुख मुळीच नसल्याचं. " आणि त्यावर वन्संनी आपली पुष्टी जोडली; " इतकंच नव्हेतर त्यांनीं मला सरळ विचारलं. " सांगा वन्सं, तुम्ही जर कां माझ्या जागी असतां तर तुम्हांला माझ्या प्रमाणंच वाटलं असतं की नाही ? माझ्या इतकंच दुःख झालं असतं कीं नाहीं ? तुम्ही लौकरच आई होणार आहांत, त्याबद्दल तुम्हांला अतिशय आनंद होत असल्याचं तुमची आनंदी वृत्तीच दर्शविते. सांगा, मला तो आनंद चाखावा असं वाटत नसेल कां ? आणि त्या आनंदाचा स्वाद घेणं या जन्मी तरी शक्य नसल्याची खात्री झाल्यामुळं माझ्या अंतरंगाला वेदना होत नसतील कां ? मला माझं जीवन निरानंदमय वाटत नसेल कां ? आम्ही सबध रात्र एकाच खोलीत काढत असतां, सधवा असून विधवेचं जिणं कटावं लागत असल्यामुळं, माझ्या हृदयाचे कसे लचके पडत असतील,

याची तुम्हांला कल्पना करतां येईल कां? ''......

" पुरे ! " मामांजी ओरडले. " तिला असल्या गोष्टी तुजपुढं बोलून दाखवायला लाज कशी वाटली नाहीं ? "

" लाजेलाहि पण कांही मर्यादा असतें बाबा ! " यन्संनीं माझी वकीली केली.

" अस्सं!" मामंजी थोडावेळ स्तब्ध राहून नंतर त्यांच्यांकडं पाहात म्हणाले. " तिला यापुढं इतकी सन-लत देतां उपयोगी नाहि. "

त्यांनी सम्मति दर्शक मान हालविली.

आणि त्या दिवसापासून माझ्या छळणुकीस सुरु-वात झाली. कुठं बाहेर जावयाचं झाल्यास, कुणाला पत्र लिहायचं झाल्यास, फार काय कुणाशीं बोलायचं झाल्यास, मला सासऱ्याची आणि नवऱ्याचं नांव सांगणाऱ्या माझ्या पतीची परवानगी घ्यावी लागू लागली.

मला हा बन्दीवास असह्य होऊं लागला. संसार सुखाला तर मी केंव्हांच पारखी झाले होते. आतां मी माझं स्वातन्त्र्य गमावून बसले.

आतां मात्र माझं डोकं भडकलं. माझ्या मनावरचा माझा ताबा उडाला. कुलाभिमानाची मला पर्वा वाटेनाशीं झाली.

आणि या गोष्टीचा ... जाऊं देत त्या गोष्टी कसं कां होईना मी पापाचरणास प्रवृत्त झालें हें खरं !

ही गोष्ट माझ्या सासरच्या मंडळीच्या निदर्शनास येतांच, त्यांनीं मला घरांतून हांकलून दिली. माझ्या पापाचरणाचा डंका सर्व जगभर पिटविला. आणि सर्वांचं मजविषयीं मन कलुषित केलं.

आणि मी ? कंठशोष करून सर्वांना माझी हकीकत सांगत असतां, कुणीही माझ्याकडं ढुंकून देखील पाहणेंस तयार नव्हता. मग माझी हकीकत संथपणें ऐकून घेण्याची गोष्ट तर बाजूलाच राहो. तुम्ही माझे जन्मदाते पिता. तुम्ही देखील माझं तोंड न पाहण्याचं ठरविलतं. मी तुम्हांला मेल्याचं देखील तुम्ही बोललांत.

बाबा ! प्रेम असं स्वार्थी अप्पलपोटी असतं कां हो !

आज आई जिवंत असती तर, तिनं तुह्माला तसं करून दिलं असतं कां ? तुम्ही वागतां आहांत तशी ती माझ्याशीं निष्ठुरतेनं वागली असती कां ?

तिनं माझं ह्मणणं खात्रीनं ऐकून घेतलं असतं. त्यावर शांत चित्तानं विचार केला असतां, आणि मी असहाय आहे असं पाहून, तिनं मला आपल्याकडं

ल्हाळत असतं. मला आसरा दिलं असतं. आणि
हे जग मला खायला उठलं असतां तिचा मायेचा
हात माझ्या पाठीवरून फिरला असता.

पण मी तुमच्या एका सहानुभूतीच्या शब्दाला
देखील पारखी व्हावं ना ?

किती दुर्दैवी मी !

बाबा ! अजून तरी ते सहानुभूतीचे शब्द मला
ऐकायला मिळतील का ?

—सुषमा.

लिखाण ता. ४।११।३९

# ही मधुकर-वृत्ती कां ? : : ७

इंदा,

मला लहानपणापासून रोजनिशी लिहिण्याचा नाद. कसलाही साधारण विचार मनामध्ये येवो, किंवा कितीही क्षुल्लक गोष्ट घडो, ती जशीच्या तशी रोजनिशींत टिपून ठेवण्याची मला मोठी हौस.

आणि आपलं लग्न होतांच मी तुझ्यावर ज्या माझ्या आवडी निवडी लादल्या, त्यांत ही एक होती.

लग्नानंतरच्या पहिल्या कांहीं दिवसांत, तरुण पतिपत्नींना एकमेकांच्या इच्छेनुसार वागणं मनापासून आवडत. परस्परासाठीं एकमेकांच्या आवडी निवडी सोडण्यांतच एक प्रकारचा गोड आनंद चाखायला मिळतो त्यानां.

आणि त्याच आनंदाच्या भरांत मजविषयींच्या आत्यंतिक प्रेमानं भारलेली तूं दररोज नियमितपणं रोजनिशी लिहिण्याची कल्पना तुला इतकीशीं आवडली नसतांही केवळ माझ्याकरितां, माझं मन दुखविलं जाऊं नये म्हणून तूं ती लिहूं लागलीस. पण पुढं तुला त्याचा इतका सराव झाला की तो तुझा एक दिनक्रमच होऊन बसला. कार्यबाहुल्यामुळं अगर इतर कांही कारणामुळं तुला झोपणेंस कितीही उशीर झालेला असो, तू त्यापूर्वी आपली रोजनिशी लिहिणेंस कधींही विसरायची नाहीस.

मी मात्र आळसामुळं म्हण, किंवा मला त्याचा कंटाळा आला म्हणून म्हण, पुढं नियमितपणं रोजनिशी लिहिनासा झालों. आणि अलीकडं तर गेले कित्येक दिवस मी ती लिहिलीच नाहीं.

ही गोष्ट माझ्या निदर्शनास आणून देऊन, परवां तूं म्हणालीस, "आपल्या दोघांत या बाबतींत दिसून येणारा हा फरक सर्व स्त्रीपुरषांत, सर्व बाबतींतच दिसून नाही कां येत.? स्त्रिया एकाद्या गोष्टीत सहसा लक्ष घालीत नाहींत; त्याविषयीं आपलेपणा वाटूं देत नाहीत. पण एकदां का त्यानी त्यांत लक्ष घातलं, त्याविषयीं आपलेपणा वाटूं दिला कीं त्या, त्या गोष्टीशीं चिरकाल चिकटून राहतांत.

पण पुरुष! एकाद्या गोष्टींत जितक्या चिवाड.

धाईनं लक्ष घालतात, त्या गोष्टीशीं समरस होता।
तितक्याच लवकर त्या गोष्टीपासून परावृत्त होतात. त्यांतील नावीन्य नाहींसं झाल्यामुळं म्हणा, किंवा इतर कांहीं कारणानुळं म्हणा ते त्यापासून होईल तितके दूर राहू लागतात. ही मधुकर वृत्तीच नव्हे कां ? ”

मधुकर वृत्ति म्हणतांच माझ्या डोक्यांत वमळासा विचार येऊन गेल्यानं मी एकदम चपापलो. गेले कांहीं दिवस तू मजबरोबर मोकळेपणानं वागत नसल्याची मला जी पुसटशी शंका आली होती, तिचा नी तुझ्यावरील उद्गारांचा कांहीं संबंध तर नसेलना ? या कल्पनेनं मी तुजकडे पाहिलं तो तुझा चेहरा भयंकर म्लान दिसत होता. पण आपल्या चेहऱ्यावर उद्विग्नतेची छटा उमटल्याच माझ्या निदर्शनास येऊ नये म्हणून तू माझ्याकडे पाहून बळेंच असं कांहीं हसलीस की——

मी बेचैन झालों. माझ्या मनांत विलक्षण कालवाकालव सुरू झाली. माझ्या मस्तकांत विचारांचा झंझावात सुटला. निराशेनी मला बेजार करून सोडलं. तुझ्या त्या तरळत्या दृष्टीनं, खिन्न नी उदास चेहऱ्यात आणि चमत्कारिक हास्यांत, मी त्यापूर्वी जाणत नसलेल्या कितीतरी गोष्टी आढळल्या.

तूं भयंकर कष्टी असल्याच मला कळून चुकलं,

इतकच नव्हे तर, त्या दुःखाचं कारण पण मीच असल्याची माझी खात्री झाली.

मी अतिशय कष्टी झालें. ती सर्व रात्र मी जागून नि रडून काढली. वृन्दा! तू भयंकर दुःखी होण्यासारखं माझ्या तुजबरोबरच्या वागण्यांत काय होतं, यावर मी खूप विचार केला. लग्नानंतरचा सर्व काळ आठवला. स्मृतिचित्रे उभी केलीं. पण तुला केव्हांही जाणून बुजून दुखविल्याचं, तुला भयंकर दुःख होण्याइतकं कठोरतेनं वागल्याचं आठवेना.

यामुळे तर मी अधिकच बेचैन झाले. एकदां वाटे तुझ्या दुःखाचं कारण तुलाच विचारून सर्व गोष्टीचा खुलासा करून घ्यावा. पण थोड्याशा विचारांती तो विचार सोडून देणंच मला बरं वाटलं. तू आपल्या अंतरंगाचे पडदे मजपुढं खुल्या दिलान खोलणार नाहींस हेंच त्याचं कारण.

आणि म्हणूनच तुझं अंतरंग जाणण्याचा दुसराच एक उपाय योजला मी. उपाय नामी होता नि अतिशय सोपाही पण होता. तो म्हणजे तुझी रोजनिशी चोरून वाचण्याचा. तू आपल्या मनांतील विचार जसेंच्या तसे रोजनिशीत मांडले असशील, आणि ते तुला न कळत मला समजतील या इच्छेनं प्रेरित झालेला मी, तुझी रोजनिशी तुझ्या परवानगीशिवाय

वाचणं योग्य नसल्याचं जाणत असतांही, तूं झोंपली आहेस असं पाहून त्यावर घाला घातला. एखाद्या अट्टल गुन्हेगाराला शोभेल इतक्या शिताफीनं वाचून काढून, तुला मुळींच संशय न येईल अशा रीतीनं तूं जागी होण्यापूर्वीच ती जागच्या जागीं ठेऊन दिली.

आतां मला तुझ्या दुःखाचं कारण कळलं. ध्यानीं नाहीं, मनीं नाहीं अशा कित्येक गोष्टी माझ्या निदर्शनास आल्या. आणि फिरून माझ्या डोक्यांत विचारांचं वादळ उठलं.

आणि ते मी जसंच्यातसं तुजपुढं मांडण्याचं ठरविलं. वृंदा! तुझ्या रोजनिशींतलि पहिली कांहीं आणि नंतरची कांहीं पानं वाचल्यास, दोहोंतील विरोध वाचणाऱ्याच्या लक्षांत पटकन् येईल इतका स्पष्ट आणि उघड आहे.

लग्नानंतरचे पहिले कांहीं दिवस मी कसा तुज-भोंवती सदानकदा भुंगासारखा पिंगा घालीत होतो, तुझा सहवास मी स्वर्गतुल्य समजत होतो, तूं थोडावेळ कां मजपासून दूर गेलीस की मला मुळीं चैन पडत नसे. तोंच मी आपल्या लग्नांस वर्षभराचा काळ लोटतो न लोटतों तोंच पूर्वी प्रमाणं सदानकदा तुजबरोबर गोष्टी करीत न बसतां, तुझ्या सौंदर्याची तोंडभरून स्तुती न करतां, तुझ्या सहवासाकरितां हपापल्याचं न दर्शवितां,

उलट क्वचित् प्रसंगी अनास्थाच दाखवित गेलं आणि अलिकडं तर मला तुझा कंटाळा आला आहे असाच तुझ्या लिहिण्याचा रोंख आहे. आणि माझ्यातील या फरकाचं कारणही तूं अलीकडच्या एका पानावर दिलं आहेस. तूं लिहितेस:—

पुरुष आणि फुलपांखरूं. दोघांच्या वृत्तींत केवढं साम्य! दोघांनाही हांसऱ्या नि सुवासिक फुलावर नाचण्याची संवय. त्यांतच आनंद. त्या फुलाचा हांसरेपणा नाहींसा झाला, त्यांतील सुवास कमी होत चालला कीं, लागले त्यांचे पाय हळु हळु दुरायला.

आणि आम्ही स्त्रिया ह्मणजे निष्पाप फुलं. आमच्या सुगंधाची, सौंदर्याची, स्वार्थी, अपमतलबी पुरुषांनी तोंडभरून तारीफ करतांच, भोळ्या भावड्या अशा आह्मी लगेच भारल्या जातो; नि स्वतःचं जीवन सर्वस्व त्यांना अर्पण करून बसतो. इतकंच नव्हेतर आमच्या सुगंधाचा आस्वाद घेऊन गेलेल्या, रंगेल नी बेलूट वृत्तीच्या पांखराकडं देखील डोळे लावून बसतो. त्याच्याबद्दल आपले-

पणा वाळगतो, त्यांच्या जीवनाशी स्वतःचं जीवन समरस करून, स्वतःस त्याची छाया मानतो. पण त्याचं वर्तन ?

ढोंगी, दुटप्पी, स्वार्थी आहे पुरुषाची जात!

स्त्री आणि पुरुष! दोघांच्या स्वभावांत केवढा फरक हा ! असं असतांही दोघानां एकत्र आणण्याची निसर्गाची सारखी धडपड चाललेली असते. आणि मी मी म्हणविणाऱ्या कणखर मनोवृत्तीच्या लोकांना देखील आपली ताठ मान त्याच्यापुढं तुकवावी लागते. किती निर्दय आहे निसर्ग. ............

मला नाही असं वाटत वृंदा ! उलट मी असंच म्हणेन कीं निसर्ग फारच प्रेमळ आहे.

वृंदा ! स्त्री-पुरुषांचा एकमेकांकडे जन्मतःच ओढा असतो. तारुण्यांमध्यें तर फारच ते एकत्र येण्यासाठीं सारखे धडपडत असतात. आणि हे एकत्र येणं समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनं विचार केल्यास लग्न-बंधना खेरीज शक्य नसल्यानं, जेव्हां कां ते लग्न-बंधनानं जखडले जातात तेव्हां त्यांना फार दिवसांपासून मनांत बाळगलेल्या इच्छा, कल्पनेनं आंखलेली सुखस्वप्ने, प्रत्यक्षांत उतरण्याचा योग

दिसूं लागतो, आणि ते हवरेपणानं एकमेकांचा सहवास जितका मिळेल तितका घेऊं लागतात.

पण पुढें जसजसा अधिक काळ लोटत जाईल तसतसा, नाविन्यांतील गोडी नाहींशी झाल्यामुळं सदान्कदा पत्नीच्या भोंवती रेंगाळणारा पति तिच्या पासून किंचित् दूर राहूं लागतो. पूर्वीप्रमाणं तासानूतास प्रणय-चेष्टेमध्यें दंग होणं त्याला मुर्खपणाचं वाटूं लागतं. पण याचा अर्थ असा नव्हे की, त्याचा तिजविषयींचा ओढा कमी होतो किंवा त्याचं तिजविषयींचं प्रेम नाहींसं होतं. छे! शक्यच नाहीं तें मुळीं! तर होतं काय तर नाविन्यामुळं उत्पन्न झालेली सहवासाची चटक नाहींशी होतांच, त्याच्या डोळ्यांवरची धुंदी उतरतांच, तो पूर्व-स्थितीला येऊन पोहोंचतो. कांहीं काल नंदनवनांत विहार करणारा तो फिरून या भूतलावर अवतरतो. आणि म्हणूनच तो पूर्वीप्रमाणं सदान्कदा आपल्या पत्नीच्या सहवासांत काळ कण्ठनासा होतो.

पण त्याच्या या शांतवृत्तीचा अर्थ पत्नी अगदीं निराळ्या रितीनं घेते. तिला वाटतं, एका स्त्रीशी चिकटून राहण्याचा पुरुष जातीचा स्वभावच नाहीं मुळीं. आणि त्या स्वभावाला अनुसरून लग्नानतरच्या अल्प काळांत तो तिच्याशी प्रेमानं वागला. पण नंतर त्याला तिचा कंटाळा आला आणि म्हणूनच तो तिच्यापासून दूर राहूं लागला.

अशा प्रकारचे विचार तिच्या डोक्यांत घोळत असतां त्यांना पुष्टी देणारी जर कां एकादी गोष्ट घडली नी ती तिच्या निदर्शनास आली कीं संशयाग्नी भडकलाच म्हणून समजावं. आणि तो योग्य वेळीं विझविण्याचा प्रयत्न न केल्यास भडकलेल्या ज्वाला तिच्या अंतरंगाचा ठाव घेत गेल्या नाहींत तरच नवल.

अन् तुझ्याही बाबतींत असच झालं वृन्दा. लग्नानंतर कांहीं दिवस सदान्‌कदा तुजबरोबर प्रणय चेष्टेमध्यें दंग असणारा मी अलीकडं कामापुरतांच तुझ्याशी हांसूं खेळूं लागलों, बोलूं चालूं लागलो, तेव्हां तुला वाटलं की माझी प्रेम सरितां दिवसों दिवस मदावत चालली आहे, आणि तुझ्या मनानं घेतलं कीं त्याला तसंच कांहींतरी सबळ कारण असल पाहिजे.

या दिशेनं तुझे विचार वाहूं लागताच, त्याला पोषक अशा गोष्टी तूं शोधूं लागलीस. अन् अशांत माझ्या पत्राची फाईल तुझ्या हातीं पडल्यानं तुला वाटलं कीं माझं प्रेम दुसऱ्यावर असल्यान मी तुजविषयीं अनास्था दाखवीत आहे.

तुझ्या रोजनिशींत एक ठिकाणीं तूं लिहितेस...

**या संग्रहांतील एकूण एक पत्र वाचलं मी! आणि मला कळुन चुकलं कीं, कमींत कमी**

बारा मुलींशीं त्यांचा परिचय होता. मैत्री होती. हायस्कूलांत असतेवेळीं देखील त्यांची एकदोन मुलींशीं मैत्री होती हें त्या मुलींच्या पत्रावरून स्पष्ट दिसतं. पण तें कॉलेजांत जातांच त्यांचीं पत्रं येण्याची बंद झाली असावीत. हो! नवीन मैत्रिणी मिळाल्यावर जुन्या मैत्रिणींची काय जरूरी? पण हा थोरे पालट अशीच चालू होती. कारण कॉलेजांतल्या पहिल्या एक दोन वर्षांत येणाऱ्या मुलींची पत्रं पुढं येण्याची बंद होऊन दुसऱ्यांचीच येऊं लागली.

जवळ जवळ सर्वच पत्रें प्रणयाच्या विविध छटेंनीं युक्त अशी आहेत. एकटी आपलं प्रेम स्पष्टपणें विदित करते, तर दुसरी ते तिला आठ दिवस न भेटल्यामुळं तिला त्यांचा विरह किती जाणवला याचा भला लांबलचक खुलासा करते, तर तिसरी पहाटे ती फिरावयास गेले वेळीं ते तिजबरोबर नसल्यामुळं, थंडी अधीक जाणवल्याच लिहिते. आणि चौथीनं तर कमालच केली आहे. ती एक पांचट सिनेमास गेले वेळीं एक प्रणयपूर्ण

प्रसंग पहात असतां तिच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. आणि त्यावेळीं तिला त्यांची एकदम आठवण झाली. इतकंच नव्हे तर पडद्यावरच्या चित्राऐवजीं त्यांचीच मूर्ती तिच्या डोळ्यापुढं उभी राहिली. आणि पांचवी ? ती तर निर्लज्जपणें लिहिते, " चारचौघांत मी तुमच्याबरोबर भांडतें, मुद्दामच भांडतें. पण नंतर आपल्याशीं गोड गोड गोष्टी करायला मिळाव्यांत म्हणून माझ्या जिवाची धडपड चाललेली असते—" आणि सहावीनं तर या सर्वांच्यावर ताण केली आहे. ती लिहिते " मी पुष्कळ रीतीनं माझं प्रेम तुमच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. पण आपण तिकडं लक्ष द्याल तर शपथ. शेवटीं तर मी कंटाळून लग्न केलं. पण खरं सांगायचं म्हणजे मला मुळीं देखील तुमचा विसर पडत नाहीं. आणि पुढंही केव्हां पडेल असं वाटत नाही."

एकना दोन. अशीं कितीतरी पत्रें त्यांच्या फाईलमध्यें आहेत.

ही त्यांची मधुकर वृत्तीच नाहीं कां ? मधुकर झालं तरी काय करतों ! एका फुलांतील

मधु चाखल्यानंतर, त्याला तिथंच टाकून दुसऱ्या फुलाकडं जातो, नंतर तिसरं चवथं····

आणि यांच्या प्रेमाची तऱ्हा झाली तरी अशीच नाही कां? मनुष्य हा निसर्गाचाच एक घटक असल्यामुळं आपलं वर्तन निसर्गाप्रमाणंच ठेवलं पाहिजे हे त्यांचं आवडत तत्व आहे की नाही?

आणि त्यांच्या प्रेयसींची नांवं पण त्यांच्या मधुकर वृत्तीला शोभेलशीच नाहीत कां! कमल, सरोज, मालती, मृणाल·······

एकदां असं वाटतं की, ही सारी पत्रं त्यांच्यापुढं ठेवावीत आणि त्यांच्या या बेछूट वृत्तीचा जाब विचारावा. पण दुसऱ्या क्षणीं असं वाटतं कीं, याचा काय उपयोग होणार आहे? एका फुलावरून दुसऱ्या फुलावर नाचण्याची संवय झालेल्या रंगेल फुलपांखराला कां ती गोष्ट त्याच्या निदर्शनास आणून दिल्यानं त्यापासुन परावृत्त करतां येणार आहे? उलट आमच्या मध्यें आद्यापि जो मर्यादेचा आडपडदा आहे तो

**नाहींसा व्हायचा. आणि आतां झ.कून चाल-लेल्या सर्व गोष्टी सन्रास सुरू व्हायच्या.**

**मग काय करूं मी? असंच निप्रेम जीवन सर्व आयुष्यभर कंठूं?**

**छे! ते शक्यच नाहीं मुळीं! मी निरति-शय प्रेम करीत असलेली व्यक्ती माझ्यावर मुळींच प्रेम करीत नसावी, इतकंच नव्हे तर माझ्या डोळ्यासमोर दुसऱ्या पुरुषाबरोबर प्रणयानें सारीपाट खेळण्यांत दंग झालेली असावी हो कल्पनाच माझी छाती दुभंगणेस पुरेशी आहे.**

तुला वाटेल कीं, वरील पत्रांत प्रणयपूर्ण मजकूर मुळीच नसून, मी संशयानं ग्रासलेल्या तुला तसा खोटा भास उत्पन्न होत असल्याचं भासविणारं आहे. नाहीं वृंदा, अशारीतीनं मी तुझ्या डोळ्यांत मुळीच धूळ फेंकणार नाही. मला माझ्या मैत्रिणीकडून आलेल्या पत्रांतील मजकूर तुला पटतो तशाच प्रकारचा असल्याचं कबूल करून, त्यासंबंधीं मला तुला कांहीं सांगतां आल्यास मी पाहणार आहे.

वृंदा! माझ्यावर कित्येक मुलींचं प्रेम असेल, नाहीं **असं मी म्हणत नाहीं. पण त्यांच्यावर माझं प्रेम अस-**

त्याच जो तूं निष्कर्ष काढलास तो कशाच्या जोरावर ? केवळ त्या मुलींचीं मला पत्रं आली आहेत म्हणून ? वेडे ! एकाचं दुसऱ्यांवर प्रेम आहे म्हणून, दुसऱ्याचं पहिल्यावर असलंच पाहिजे असा निष्कर्ष काढणं योग्य होईल का ? तर्कशुध्द होईल कां ?

वृंदा, आकाशांत सूर्यबिंब उगवतांच पुष्कळ सूर्य कमळं उमलतात, प्रफुल्लित होतात, आणि अशा रीतीनं आपलं सूर्याविषयींचं प्रेम व्यक्त करतात. न बोलतां आपल्या हृदयाचे बोल त्याला ऐकवितात. आणि लबाड सूर्य त्यांच्याकडं पाहून मिष्किलपणें हांसतो. पण तेवढ्यावरूनच सूर्याचं त्या कमलांच्यावर प्रेम आहे असा निष्कर्ष काढणं योग्य होईल कां ?

वृंदा, मी इतकासा सुंदर नसेन, जाडा विद्वान् नसेन किंवा उत्कृष्ट खेळाडू नसेन, पण प्रेमास हपापलेल्या, कल्पनेच्या भराऱ्या मारणंस सोकावलेल्या अल्लड तरुणींची मन स्वतःकडं ओढून घेण्याइतकं माझ्यांत आकर्षण आहे खास !

पण ती माझी चूक कां ?

यावर तूं म्हणशील " तुम्ही त्यांना तसं करणेस उत्तेजन दिलं असलं पाहिजे. तसं नसतं तर त्यांच्या मनांत तुमच्या विषयीं वसत असलेलं प्रेम, बेधडकपणें पत्रांतून व्यक्त करण्याचं धैर्य त्यांना केव्हांही झालं नसतं"

वृंदा, तारुण्याच्या रम्य उद्यानांत विहार करणाऱ्या आणि हल्लींच्या शाळा कॉलेजांतील मोकळ्या वातावरणांत पोहणाऱ्या, माझ्यासारख्या रंगेल नी खेळाडू वृत्तीच्या तरुणाला, त्याच्याशी आपण होऊन स्नेह संपादन करू इच्छिणाऱ्या सुंदर तरुणींची मैत्री – फक्त मैत्रीच हं ! चटकन्, आणि त्याला तसंच कांहीं सबल कारण झाल्या वांचून सोडण्याची इच्छा होईल कां ? वृंदा, कल्पनेनं रेखाटलेल्या आदर्श सृष्टींत विहार न करतां, या सत्य सृष्टींत, आपण वावरतो त्या जगांत दिसणाऱ्या गोष्टींचं बारकाईनं अवलोकन कर म्हणजे माझं वर्तन मुळींच गर्हनीय नसल्याचं तुला कळून चुकेल.

यावर तूं असंही म्हणशील "इतक्या मुलींशी तुमची मैत्री असतांना, त्या तुमच्यावर प्रेम करीत असल्याचं, तुमच्या निदर्शनास आणून दिलं असतांही तुम्ही, हल्लींचे तरुण त्यांच्याशी पवित्र मित्रत्वाच्या नात्यानं राहाणं शक्य आहे कां ?"

बरोबर आहे तुझं म्हणणं. पवित्र आचरण ठेवणं कदाचित् मला शक्यही झालं नसतं. पण तें केंव्हां ? त्यापूर्वीच माझं तुझ्याशीं लग्न झालं नसतं तर ! माझं तुझ्यावर निरतिशय प्रेम नसतं तर ! वृंदा, बऱ्याच मुलींशी माझी मैत्री असून, त्यांच्यापैकी एका-विषयींही माझ्या मनांत पापी वासना उद्भवली नाही.

याचं एकमेव कारण म्हणजे तू ! तुझी ती प्रेमळ मूर्ति माझ्या मनःचक्षूसमोर नेहमीं उभी राहात असल्यानं, मी तुझ्याशी पवित्र लग्न बंधनात जखडला गेल्याची जाणीव सदोदित असल्यानं, मी कधींही शील- भ्रष्ट होऊं शकलो नाही.

माझ्यावर प्रेम करणाऱ्या मुलींबरोबर मी तासन् तास गप्पा मारीत असे, कॅरम खेळत असे, सिनेमास जात असे, पण त्यांच्याबरोबर केव्हांही प्रणयाचे सारी पाट खेळलो नाही. प्रिय मित्राच्या पत्नीला बरोबर घेऊन सिनेमांस जातेवेळी ज्या भावना आपल्या मना-मध्यें वसत असतात, त्याच भावना त्यावेळी माझ्या मनामध्यें वसत होत्या.

पण एवढं मात्र खरं कीं, माझ्या मोकळ्या वागण्याचा भलता अर्थ करून त्या खुळ्या पोरी फसत होत्या.

स्त्रियांना त्यांच्याकडं आकर्षिले जाणाऱ्या पुरु-षांच्या डोळ्यांतील प्रेमाची छटा चटकन् कळते असं म्हणतात. पण मला वाटतं कीं, इतर कित्येक कपोल कल्पित गोष्टीप्रमाणंच ही एक आहे. निदान माझा स्वतःचा अनुभव तरी तसा आहे. तसं नसतं तर प्रण-याचें रंग उधळण्याच्या इच्छेनं माझ्याशी मैत्री जोड-णाऱ्या मुलींना, त्यांच्या बरोबरच्या माझ्या निष्प्रेम वर्त-

माझ्या मुंडाशीं प्रेम दडी धरून बसलेलं कशाला दिसल असतं ? किंवा आपल्या हृदयाचें ठसे मोहक कागदावर उठवून कशाला त्या मजकडं धाडल्या असत्या ?

पण मी ती पत्रं तशीच जवळ बाळगीत होतों ते पुढं काय येतं हे पाहण्याकरितां.

वृंदा, या पोरी शाळा कॉलेजांतून कितीही वर मान करून हिंडल्या, तरी लाजऱ्या त्या लाजऱ्याच ! प्रेमाच्या बाबतींत तरी त्यांचे ओठ मिटलेलेच राहायचे. त्यांचें प्रेम नसलेल्या पण त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या तरुणानं, जर कां खुल्यादिलानं त्यांना पत्र लिहून आपलं प्रेम व्यक्त केलं कीं, त्या ते पत्र भेटेल त्याला दाखवत सुटतील, त्याच्या उद्दट वर्तनाची प्रिन्सिपलला वर्दी देतील, आणि त्याला शिक्षा होतांच समाधान मानून स्वतःच्या कर्तबगारीचा डंका स्वतःच जगभर पिटवतील. पण तीच बाजू स्वतःवर उलटली कीं, पडलंच त्यांच्या तोंडाला कुलुप. त्यांचा प्रियकर त्यांना कितीदांही भेटो त्यांच्यापुढं स्पष्टपणें आपल्या प्रेमाची वाच्यता करण्याचं धैर्य···छे शक्यच नाहीं ते मुळी.

अन् ही मजा पाहण्यांत, अज्ञानाचं सोंग आणून त्यांची प्रत्येक हालचाल सूक्ष्मपणें अवलोकन करण्यांत, एक प्रकारचा अननुभूत आनंद चाखायला मिळे. त्याची मला मोठी चटक लागलीं होती म्हणेनास.

ही माझ्या हातून चूक होत असेल. त्यांत माझा पोरकटपणा, टारगटपणाही म्हण हवा तर दिसत असेल. पण त्याच्या बुडाशीं पाप होतं कां ? त्यांत तूं म्हणतेस तशा प्रकारची मधुकर-वृत्ती दिसते कां ?

वृंदा, इतक्या मोकळ्या मनानं पतीनं पत्नीला लिहीणं योग्य दिसेल किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं. पण माझ्या प्रेमाविषयीं तुझ्या मनांत शंका उद्भवली असतांना, त्याचं निरसन याहून दुसऱ्या रीतीनं करतां येणं शक्य न वाटल्यावरून मी माझ्या मनांतील विचार जसेच्या तसें तुजपुढें मांडले आहेत.

वृंदा, करशील ना तूं यावर शांतचित्तानं विचार !

—वृंदावन.

लिखाण ता. १०।११।३९

# पवित्र-विधि : : ८

धीरा,

माझ्या बालपणाची नि जिवाभावाची तू मैत्रीण शाळेंत असता आपण एकत्र बसायच्या, हिंडायच्या नि खेळायच्या. आपली ती अभंग जोडी पाहून पुष्कळांनी आपली चेष्टा करावी, पण त्यामुळं आपणांस वाईट वाटण्याऐवजी उलट आनंदच होई, आणि आपण परस्पराकडे अधिकच आकर्षिल्या जात. पण आतां? मला पहातांच तुझ्या कपाळाला आंठ्या पडतात आणि तू मला टाळूं पाहतेस. तरीही जर कां मी लोचटपणानं तुझ्याशीं बोलण्याचा नी तुजकडे येण्याचा प्रयत्न करूं लागलें की, तू तुसडेपणानं म्हणतेस, " मला नाही बाई आतां सवड ! "

तुझ्यातील या विलक्षण फरकाचं कारण न कळण्याइतकी कां मी दुधखुळी आहे ?

माझी प्रवृत्ति स्वैराचाराकडे वळल्याचं इतरांप्रमाणं तुलाही कळतांच, तुला माझ्यापासून चार हात दूर राहवस वाटू लागलं. माझ्या मैत्रीची झळ तुझ्या पवित्र चारित्र्याला लागेल आणि त्याला डाग पडेल अशी तुला भीति वाटली; अन् तूं माझ्यापासून दूर, होताहोईल तितक्या दूर राहूं लागलीस.

मला या गोष्टी कळत नी म्हणूनच तुला भेटून खुल्या दिलानं सर्व गोष्टी तुला निवेदन कराव्यांत असं मला वाटे. आणि त्या इच्छेनेच मी तुजकडे येई, पण तुझ्या त्या सहानुभूतिशून्य चेहऱ्याकडे पाहतांच, नि तुझ्या मज बरोबरच्या निष्प्रेम वर्तनाकडे लक्ष जातांच माझे विचार आंतल्या आंत विरून जात, स्वप्न भंग पावत, हृदयाचं पाणी पाणी झाल्यासारखं होई नी जड अन्तःकरणानं मी घरीं परते, नी मनसोक्त रडून घेई.

मी तुला भेटून सर्व गोष्टी निवेदन करणं शक्य नसल्याचं जाणूनच संपूर्ण खुलासेचं हे पत्र मी तुला पाठवत आहे.

धीरा! नाहींना तूं माझं हें पत्र न वाचतां फाडून टाकणार? सांग नाहींना?

'नाहीं' या समजुतीनंच मी हें पत्र लिहीत आहे. अन् त्याबरोबरच ते वाचून होतांच मिनीटभरही ते न ठेवतां राई राई एवढे तुकडे करण्याविषयीं मी तुला हात जोडून विनवीत आहे.

धीरा ! तुझा लग्न दिवस आठवतो कां तुला ? कुणा मुलीला त्याचा विसर पडेल ? पण तुला एका गोष्टीचा मात्र विसर पडला असेल. अन् ती म्हणजे तूं मला दुसऱ्या दिवशीं निवेदन केलेल्या गमतीदार गोष्टीचा. लग्न होतांच तूं तुझ्या पतीबरोबर सासरीं गेलीस, नी त्या रात्रीं एक गोड प्रसंग घडला.

तूं तुझ्या पतीबरोबर घालविलेल्या पहिल्या रात्रीचं वर्णन तूं मजपुढं किती रसभरित केलंस ! पवित्र मिलनाचं हें असंच असतं. त्याची वाच्यता आपल्या जिव्हाळ्याच्या मैत्रिणीजवळ करणेंस कसली आली आहे भीती ? अन् कसली आली आहे लाज ? फार काय या दोन्हीही गोष्टींचा त्या वेळीं लोप होतो असंच म्हटलं पाहिजे. अन् तूं पण या तत्वाला अनुसरूनच वागलीस.

या वेळीं मला दुसरा एक प्रसंग आठवतो.

आपण दोघीही एकदां नोटीसबोर्डपुढं उभ्या असतां एक वात्रट मुलगा मुद्दाम तुला खेटून गेला. त्यावेळीं तुझ्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. अन् रागानं बेफाम झालेली तूं त्याला नाही नाही त्या शिव्या दिल्यास. तूं मागं वळून पाहतेवेळीं तो तिथं असता तर, तूं त्याच्या कानफाडांत ठेऊन देणेसही पण मागं पुढं

पाहिलं नसलंस; पण त्याची वेळ चांगली म्हणून त्यानं आधींच तिथून काढता पाय घेतला होता.

एका परक्या पुरुषाचा स्पर्श म्हणून तुला तो नको होता.

आणि लग्नानन्तरचा तुझ्या पतिचा स्पर्श म्हणून तुला तो अतिशय प्रिय वाटत होता.

वरील दोन्हीही, प्रसन्ग माझ्या डोळ्यापुढं उभे रहात आणि ते माझी मनोभूमिका तयार करण्याचं काम करीत.

काय असेल ते असो, पहिल्यापासून मला तुझ्यां हिंदू मुलींत मिसळण्याची सवंय. दिवसानोंदिवस मी तुमच्या समवेत घालवावा, तुमच्याबरोबर खेळांव, हिंडांव नी अभ्यास करावा.

अन् ह्मणूनच तुझ्या सारख्या माझ्या जिव्हाळ्याच्या मैत्रीणींनीं मॅट्रिकला आपला ऐच्छिक विषय संस्कृत घेतांच मीही तोच घेतला.

पुष्कळांनां त्याचं आश्चर्य वाटलं. माझ्या आप्त इष्टांपैकीं कांहीं लोकांनी तर नाकं मुरडली, नी उपहासानं म्हटलं " शंकरशेट स्कॉलर येणार आहे ही ! "

आणि खरं सांगायचं ह्मणजे या प्रतिकूल टिके मुळंच मी संस्कृतचा अभ्यास अतिशय मन लावून करूं लागले. नी शेवटी शंकरशेट स्कॉलर येऊन सर्वांच्या नाकावर टिच्चलेही.

पण यामुळं झालं काय तर माझ्या जातीतील इतर मुलींहून माझी मनोभूमिका अगदीं निराळ्यारीतीनं तयार होऊं लागली. प्राचीन भारतीय संस्कृतीचा माझ्या मनावर विलक्षण पगडा बसला.

एकदां असंच आपण त्यावर बोलत बसलो असतां माझ्या आप्तांपैकी एक गृहस्थ तिथं आले. आपलं संभाषण बन्द ठेऊन मला त्यांच्याशीं बोलावं लागलं. अन् या घाईत त्यांची तुला ओळख करून देण्याचा साध्या शिष्टाचाराचा देखील मला विसर पडला. चूक सुधारण्याच्या इच्छेनं वरील गृहस्थ निघून जातांच मी तुला ह्मणाले, " हे गेलेले गृहस्थ कोण आहेत हें ठाऊक आहे कां तुला ? "

माझा प्रश्न औपचारिक होता. प्रश्न टाकतेवेळी तुझ्याकडून नकारार्थी उत्तर येणार असं मला वाटलं होतं.

पण तुझ्या त्या उत्तरानं माझ्या वरील विचारांना धक्का दिला. मिष्किल हास्य करीत तूं ह्मणालीस, " ओळखतें मीं त्यांना."

अन् जेव्हां कां मी चकित झाल्याचं तूं पाहिलंस तेंव्हां अधिक खुलासा करण्याच्या हेतूनं तूं म्हणालीस, " सातारचेच ना ते ? ज्यांनीं आपल्या दोन मुलीं मुद्दाम अविवाहित ठेविल्या आहेत ते ... "

तुझ्या त्या वाक्यानं माझ्या हृदयाचा भडका उडविला. मला लाजविलं; नी शरमेनं मी मान खालीं

खालीं घातली. मग माझ्या मुखांतून शब्द बाहेर पड-
ण्याची गोष्ट तर बाजुलाच राहो.

तेव्हां अतिशय गंभीर बनलेली तूं मला म्हणालीस,
" पोटाची भूक शमविण्यासाठीं, थोडक्यांत जगण्यासाठीं
आपलं शील गमवितांना मी कांहींना पाहिलं आहे. आणि
त्यांच्याबद्दल मला तिरस्कार वाटण्या ऐवजीं अनुकंपाच
वाटली आहे. पण स्वतःच्या प्रतिष्ठितेसाठीं, जगामध्यें खूप
मानमरातब मिळावा म्हणून, विपुल धनदौलत कमवावी
म्हणून, स्वतःच्या बायका-मुलींच्या शीलाचा मोबदला
देणारे लोक पाहिले की, माझ्या अंगाची लाही लाही होते,
नी वाटूं लागतं कीं ... ... "

तूं तुझं वाक्य अर्धवटच सोडलस; पण तेवढ्या-
वरूनच माझं सर्वांग घामाघुम झालं. माझं मन अति-
शय बेचैन बनलं. अशा लोकांशीं आपला स्नेह-संबंध
जोडला जावा, फार काय अशा लोकांची मी जात सांगावी
याचा देखिल मला विषाद वाटला.

आतां मी माझ्या समाजाकडे थोड्याशा चौकस-
नजरेनं पाहूं लागले. प्रत्येक बाबतीत आपल्या अभ्यासूक
दृष्टींचा उपयोग करावा असं मला वाटूं लागलं.

अशांत माझ्या लग्नाचं जमून आलं.

माझ्या परिचयाच्या एका पदवीधर श्रीमंत तरु-
णाचं मन माझ्याकडे आकर्षिलं गेलं. त्यांच्याच शब्दांत

सांगायचं म्हणजे त्यांच माझ्यावर प्रेम जडलं. अन् मलाही पण त्यांनी लग्नासाठीं पुढं केलेला हात झिडकारणं बरं वाटलं नाहीं. नी माझ्या घरांतील मण्डळींनी पण त्याला हरकत घेतली नाही.

माझं लग्न झालं. किती आनदांत होते मी त्या दिवशीं. सूर्यास्तानन्तर माझ्या मैत्रिणींनी माझ्या आंगावर सुंदरसा पेहराव चढवितांच, लौकरच घडणाऱ्या एका गोड प्रसंगाची मला आठवण झाली. मी चोरून माझ्या पतीच्याकडं पाहिलं. माझ्या हृदय पटलावर आनंदाच्या उर्मी थै थै नाचू लागल्या.

मी माझा चेहरा जितका निर्विकार ठवतां येईल तितका ठेवण्याचा प्रयत्न करीत होते तरी, माझ्या अंतरंगाची छटा माझ्या चेहऱ्यावर उमटलीच. अन् ती माझ्या एका चाणाक्ष मैत्रिणीच्या निदर्शनास यतांच ती मला म्हणाली, " इतकं आनंदीत व्हायला नको कांहीं. अजून उद्यांचा दिवस जायाचा आहे म्हटलं. "

माझ्या मैत्रिणीच्या बोलण्यांतलि खोच माझ्या मुळींच ध्यानांत न आल्यानं मी गोंधळले. थोडीशी विचारांतही पडले. मला वाटलं माझी शेजेची रात्र आजची असतांना माझ्या मैत्रिणीनं अजून उद्यांचा दिवस जायला हंव असं म्हणावं नी मिष्किलपणें हंसावं.

तोंच माझी आई माझ्याजवळ येऊन म्हणाली,

" बाळ,आईचा उल्लंघ करूं नकोस बरं! अजून तुझ्यां-तला हूडपणा गेला नाहीं म्हणून सांगते "

माझा संशय नाहींसा झाला. मला वाटलं खात्रीनं आजचाच बेत असला पाहिजे. माझी मैत्रिण काय सांगते···

मी आईच्या उपदेशाप्रमाणं वागण्याचं कबूल करतांच, तिनं प्रेमानं माझ्या पाठीवरून हात फिरवला नी तोंडानं " आहेच मुळी माझी बाळ आज्ञाधारक " म्हणून ती निघून गेली.

आणि थोड्यावेळानं कोपऱ्यांतल्या सुंदर नी सुशोभित पलंगावर मला बसवून माझ्या मैत्रिणी पण निघून गेल्या.

अन् मी डोळ्यांत जीव सांठवून माझ्या पतीची वाट पाहूं लागले. पण माझ्या पति ऐवजी आमचा लग्न विधि उरकणारा धर्मगुरू खोलींत प्रवेश करतांच, मी चटकन् पलंगावरून खाली आले.

मला वाटलं अद्यापी लग्न विधि पैकीं कांहीं भाग व्हायचा असला पाहिजे.

पण जेव्हां कां त्यानं दार बंद करून माझ्याशी लगट करणेस सुरवात केली, तेंव्हां माझ्या छातींत धडकी भरल्यासारखी झाली. नी मी किंकाळुन दूर होतांच, माझ्या जवळ येत तो म्हणाला, " फारच अजाण आहेस तूं मुली! चल ये माझ्याजवळ. हे धर्म कृत्य

आहे. यात पाप नसून पुण्यच आहे "

आतां मात्र मी रागानं बेफाम झाले. मी त्याला दूर लोटलें; नी झटकन् दार उघडून बाहेर आले.

मला तशा त्या अवतारांत पाहतांच, तिथं उभ्या असलेल्या माझ्या आप्त मंडळीत कुजबुज सुरू झाली. आणि मी वृत्ती बधीर झाल्याप्रमाणं त्यांच्याकडं पाहात असतां, धर्मगुरू तिथं प्रवेश करीत त्यांना म्हणाला, "धर्मानं पवित्र ठरविलेली गोष्ट करणेस पाप वाटतं हिला "

आतां प्रत्येकजण माझ्याकडं विचित्र नजरेनं पाहूं लागला. जणुं काय माझं वर्तन म्हणजे मूर्खपणाचं, इतकच नव्हे तर आत्मघातकी वाटत होतं त्यांना.

आतां मात्र वेडी होण्याची पाळी आली होती माझ्यावर. मी धांवतच आईजवळ गेले नी तिच्या गळयाला घट्ट मिठी मारून म्हणाले, " आई, पहागं काय करायला सांगताहेत हे ! "

" अगदींच मूर्ख आहेस तूं हिला " आई स्वर चढवून म्हणाली " तरी मी तुला धर्मगुरुंच्या आज्ञे-प्रमाणं वाग म्हणून मगा बजावले होते. "

आईचे ते उद्गार ऐकून माझ्या अंगातून वीज सळकून गेल्यासारखी झाली. अन् तारवटलेल्या नजरेनं तिच्याकडं पाहात मी म्हणाले "काय बोलते आहेस तूं हे

आई? माझ्या वडिलांच्या ठिकाणीं असलेल्या, फार काय लग्नासारखे पवित्र विधि पार पाडणाऱ्या गुरुवरांवर...

तोंच आईनं माझ्या कानशिलांत जोरानं लगावल्यानं मी कोलमडून खालीं पडले.

मी उभी राहाते न तोंच माझ्या पतींना माझ्या शेजारी उभं राहिल्याचं मी पाहिलं. त्यांच्या पायाला घट्ट मिठी मारून मी म्हणाले "पहाहा हे मला काय करायला सांगताहेत ते"

"फारच शहाणी झाली आहेस तूं" ते कडाडले "धर्माच्या विरुध्द वर्तन करून, चार चौघांत स्वतःची शोभा करून घ्यावयाला नी माझं नांव बद्द करायला लाज वाटत नाही तुला?"

आतां मात्र मी वृत्ती बधिर झाल्याप्रमाणं त्यांच्याकडं पाहूं लागले. माझ्या नेत्रांतून रागाच्या ज्वाला बाहेर पडत होत्या नी त्यांत तिरस्काराचं तेल ओतलं जात होतं. तोंच ते ओरडले 'जा! निमुटपणें आंत जा, नी धर्मगुरूंच्या आज्ञेप्रमाणं वाग"

अन् मी त्यांच्या आज्ञेप्रमाणं वागत नसल्याचं पाहतांच, त्यांनी मला फरफटत खोलींत आणली नी ते मला तिथ सोडून खोलीबाहेर पडतांच, धर्मगुरुनं दार बंद करून घेतलं.

अन् मी किंकाळी फोडून धाडकन् खालीं पडले

मी शुध्दीवर आले तेव्हां माझ्या शीलावर घाला घालणारा तो धर्मगुरु तिथं नव्हता पण माझा लग्नविधि पार पाडणारा दुसरा गुरु थोड्या अंतरावर उभा होता.

तो माझ्याजवळ येऊं लागतांच झटक्यासरशीं उभी राहिलेली मी त्याला म्हणाले " तुम्हीं समजतां तरी कोण मला ? वेश्या कीं ... "

" धर्मगुरुला असं बोलणं बरं नव्हे " तो धीर गंभीर आवाजांत म्हणाला "अन् पवित्र विधिबद्दल अशा तऱ्हेचे अनुदार उद्गार काढणं म्हणजे, स्वतःस पाप सागरांत लोटण्यासारखं आहे. "

' खरं आहे ' रागानं बेफाम झालेली मी म्हणाले " मग ते एकटे माझ्या पदरीं पुण्य बांधून गेले आहेत. आतां तुम्ही ... "

" फार भाग्यवान् आहेस तूं मुली "

धीरा, त्यांवळीं मला काय वाटलं असेल! माझ्या हृदयाचा किती भडका उडाला असेल ! याची कल्पना तुला करतां यायची नाही, नी मला माझे विचार पत्रां-तून व्यक्तही पण करतां यायचे नाहींत. पण मी तुला इतकंच सांगू शकते कीं, त्या दिवशी माझ्या वृत्तींत विलक्षण फरक घडून आला. माझ्या भावना जळून खाक झाल्या नी माझं हळुवार अन्तःकरण त्यांत होरपळून निघालं.

आतां पूर्वी प्रमाणं मला माझ्या शीलाची मात-ब्बरी वाटेनाशी झाली. मला वाटलं माझ्यातलि पावित्र्य मला सोडून गेलं आहे. नव्हे, धर्मगुरुच्या आवर-णाखालीं बावरणाऱ्या सैतानानं, माझ्या असहाय, दीन, दुबळ्या स्थितीचा फायदा घेऊन, तिला बळजबरीनं माझ्यापासून ओढून नेली नी मला रौरव नरकांत लोटली.

मला माझ्या आतिष्ठांचा भयंकर राग आला. माझी आई, बाबा नी माझे पति. ···

माझे पति ! छे! मी त्यांना माझे म्हणण्यास देखील तयार नव्हते. आपल्या पत्नीला, स्वताःच्या हातानं एकदां नव्हे दोनदां परपुरुषाच्या स्वाधीन करणाऱ्याला पति म्हणायला मला लाज वाटत होती. माझ्या मनांत त्यांच्या विषयी वसत असलेला पूज्य भाव नाहींसा झाला होता. इतकंच नव्हे तर मी त्यांच्याकडे तिरस्कारानं पाहूं लागले होते.

अन् अशांत मला गर्भ राहांताच मी बेभान बनले. माझी सारासार बुद्धी देखील नाहीशी झाली. नी मी पाहिजे त्याला पाहिजे तेव्हां नी पाहिजे ते बोलूं लागले.

एके दिवशीं माझ्या पतीची कांही स्नेही मंडळी त्यांची चेष्टा करीत होते. मी पलीकडे वाचत बसल्याचं पाहून तर त्यांच्या चेष्टेला विशेष जोर आला होता. ते आग्रहानं त्यांना म्हणत होते. " लौकरच मूल होणार. पेढे खायला हवेत आम्हांला "

मला तें असह्य झालं. मला माझ्या पतिपासून गर्भ न राहिल्याचं, थोडसं स्पष्ट सांगायचं म्हणजे त्या धर्मगुरुपासून राहिल्याचं मी जाणत असल्यानं, मी भयंकर संतापले, नी भान न राहून त्यांच्या स्नेह्यांना म्हणाले, " मला मूल होणार हें खर ! पण त्याचे पेढे यांच्याजवळ काय म्हणून मागतां ? मुलाच्या खऱ्या बापाजवळ, धर्मगुरुंच्याजवळ मागा कीं ! "

" हिल्ला ! " माझे पति ओरडले.

मी त्यांच्या दरडावण्याला मुळींच भीक घातली नाहीं. उलट विकट हास्य करून नी तुच्छतापूर्वक दृष्टीक्षेप करून मी आंतल्या खोलीत आले. माझ्या मागोमाग माझे पतीहि तिथं प्रवेश करीत म्हणाले "आगदीच ताळतंत्र सोडला आहेस तूं आतांशा ... "

" काय चूक होतं माझं म्हणणं ? '

" चूक नसलं म्हणून चार चौघांत कां कुणी तसं बोलतं ?"

"कां ? लाज वाटते तुम्हांला त्याची ? माझ्या हाताला धरून त्या पाशवी पिशाच्याकडं घेऊन जाते वेळी लाज नाही वाटली ? "

" निर्लज्ज ! बेशरम ! "

" कोण निर्लज्ज ? कोण बेशरम ? तुम्ही कां मी ? "

" याचं उत्तर मी लौकरच देईन " म्हणत ष ओजोरानं पाय आपटीत ते खोलीबाहेर पडले.

नंतर उत्तर देण्याची त्यांनीं मला जी धमकी दिली होती त्यांत कांहीं अर्थ नसल्याचं मी जाणत होतं. माझ्या पुढं उभं राहण्याचं फार काय माझ्या डोळ्यास डोळा भिडविण्याचं ज्याना धैर्य होत नसे, ते मला सडकून उत्तर ते काय देणार !

पण यामुळं झालं काय तर आमचं कायमचं बिनसलं. आम्हीं परस्परांचीं तोंडही पाहिनासें झालो, अन् यांतच माझ्या स्वैराचाराचं बीज रोवलं गेलं.

धीरा, आधींच मी माझं शील गमावून बसलं होतें. त्याचं जिवंत प्रतिक माझ्या मुलाच्या रूपानं सदोदित माझ्या नजरेसमोर उभं होतं. त्याचे वडील म्हणून माझे पति आपलं नांव सांगत नी लावत होते ......

आतां तूंच सांग त्यावेळीं माझ्या मनाची काय स्थिती झाली असेल ? अशावेळीं मला शीलाची चहाड राहणं, जगाची पर्वा वाटणं शक्य आहे कां ?

पण या आंतल्या गोष्टी न जाणणाऱ्या तुला माझा राग आला. तुला माझं वर्तन गर्हणीय वाटलं. त्याबद्दल मी तुला दोष देत नाही धीरा. खरी वस्तुस्थिति न जाणणारी कुणीही स्त्री असंच म्हणेल. मला त्याचं इतकंस वाईटही वाटत नाहीं. पण खरी वस्तुस्थिती जाणणाऱ्या

माझ्या जातीतिल लोकांनां जेव्हां कां मी माझ्याविषयीं अनुदार उद्गार काढताना पाहतें, तेंव्हा मात्र माझ्या पायाची तिडीक मस्तकांस जाऊन भिडतें. या ढोंगी समाजाचा मला मोठा वीट येतो.

धीरा, माझ्या लाडक्या मैत्रिणी, आतां तर जाईल ना तुझा माझ्यावरचा राग! माझ्या सहवासामुळं तुझ्या निष्कलंक चारित्र्यावर नसते शितोडे उडूं नयेत म्हणून तूं माझ्या पासून इतःपर दूर रहा. मला पत्रही पण पाठवूं नकोस; पण मला पाहतांच नाहीं नां तुझ्या कपाळावर आठ्यांच्या जाळ्या पसरणार? खरचं सांग नाहीना!

—हिल्डा.

लिहिणाग ता. २०।११।३१